श्रीगुरुदत्तप्रसन्न.

संगीत

भुवनसुंदरी
अथवा
सतीविजय नाटक.

अंक १ ते ५.

हें पुस्तक बाळकृष्ण विठ्ठलशेट धामणस्कर
यानीं रचिलें
तें,
सावळाराम विठ्ठलशेट धामणस्कर यानीं
मुंबईंत
"गणपत कृष्णाजी" छा० छा० प्रसिद्ध केलें.

आवृत्ति ३ प्रति २०००
सन १९०५ शके १८२७.

किं [illegible]

प्रस्तावना.

हल्लीं नाटक ह्मणजे काय हें निराळें सांगणें नको,तरी हल्लीं नवीन तऱ्हेच्या प्रयोगांवर, नविन रचनेवर आणि चालीवर आमच्या रसिकजनांची विशेष प्रीति जडली आहे. ह्मणून आह्मीं हा प्रस्तुतचा ग्रंथ लिहिला आहे. या नाटकालीं कोणत्याही ग्रंथाचा आधार नसून भाषांतरही केलें नाहीं. हें केवळ माझ्या मतीनें निवळ मनःकल्पित लिहिलें आहे. तरी यांत स्त्रियांना व पुरुषांना बोध कसा ठसतो तें वाचल्यानें अथवा प्रयोग पाहिल्यानें स्पष्ट कळून येईल.

या पुस्तकांत सतीस्त्रियांवर संकटें आलीं असतां मुक्त कशा होतात हें स्पष्ट दिसून येतें.

या पुस्तकांत माझ्या अल्प बुद्धिमुळें दोषही पुष्कळ असतील त्यांबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी फार ;फार आशा आहे.

आतां जगचालक जो अनंतकोटिब्रह्मांडनायक ईश्वर याची प्रार्थना करून हा लेख पुरा करतों

पुस्तक कर्ता

बाळकृष्ण.

हें पुस्तक पितृभक्तिस्तव

कैलासवासी

ती० रा० रा० विठ्ठल जयराम शेट धामणस्कर

यांचे चरणीं अर्पण केलें आहे.

सावळाराम विठ्ठल धामणस्कर.

पात्रें.

सूत्रधार.	नाटकाचार्य.
नटी.	त्याची स्त्री.
भुवनसुंदरी	नायिका.
विनयवसु	क्रूरसेन राजाचा कंचुकी
क्रूरसेन राजा.	हिमावतीनगरीचा राजा.
सुविचार.	क्रूरसेन राजाच्या मर्जीतला एक गृहस्थ
मानाजी.	क्रूरसेन राजाचा शिपाई
प्रतापचंद्र	भुवनसुंदरीचा पति, नायक.
चंदु.	क्रूरसेन राजाचा नोकर.
सत्वशील.	इरावतीचा राजा.
प्रभावती.	सत्वशील राजाची स्त्री.
शारदा.	प्रभावतीची दासी.
कुविचार.	सत्वशीलाचा प्रधान.
चंद्रकेतु.	कनकावतीचा राजा.
सुमित्र	चंद्रकेतु राजाचा प्रधान.

या शिवाय देवदूत, स्त्रीसैन्य, भिल्ल, सांडणीस्वार, येसाजी, तानाजी, राजपुत्र, वारांगना; शिपाई वगैरे पात्रें आहेत.

श्रीगजानन प्रसन्न.



संगीत

भुवनसुंदरी
अथवा
सतीविजय नाटक.

अंक १ ला.

मंगलाचरण.

पद.–(पंच तुंड नर रुंडमाल०) ही चाल.

चराचरा आराम राम जो तत्पद प्रेमें आधिं नमुनी ॥
कुसुमांजलिही कार्यारंभीं वाहतों गणपति तव चरणीं ॥
॥धृ०॥ पाशांकुशधर हरकुमरा ओ रंग भरीं या मत्कवनीं ॥ विघ्नतमातें दूर करुनी मज तारीं सदया करिं धरुनि ॥ विठ्ठलसुत बल्वत्कवि विनवी बुधजन सेवा मनिं धरुनि ॥ दीनोद्धारा वरदहस्त मम मस्तकिं ठेवीं सदयपणीं ॥ १ ॥

पद—

नमुं आम्हि विमल राम पदकमल ॥ नमुं० ॥ प्रभु तो, सुखवो, सकलां, या बुधां म्हणुनी ॥ नमुं० ॥ धृ० ॥ नारद, तुंबर, सनक, सनंदन ॥ गाती ज्याची लीला सुस्वर ॥ नमिती पदयुग्मास ॥ सुरादि सर्वहि ॥ खलमद दंडुनी ॥ योगीजन मनरंजन करितो ॥ ऐसा प्रभु तो ॥ आम्ही गातों ॥ देवो यश सदा ॥ ॥ नमुं० ॥ धृ० ॥

सूत्रधार—(पुढें होऊन) अहाहा ! निशारमण चंद्र आपल्या उदयानें आपली प्रिया जी रात्र तिला किती बरें शोभा देत आहे. उघडच आहे, ज्या स्त्रिया पतिव्रता असतात त्या आपल्या पतीच्या उदयकालीं आनंदित आणि विपत्तिकालीं दुःखितच असायच्या. असो,पण या मनोहर प्रसंगाची शोभा पाहण्याकरितां मी माझ्या प्रियेला बोलाविलें असून ती अद्याप कां बरें आली नाहीं. (पडद्याकडे पाहून)

पद.—(कितिप्रीतीतरीनाटकीं०) ही चाल.

किति ठुमकत मुरडत येत असे ॥ येत असे प्रिया ये०॥धृ०॥ सडपातळ तनु नाजुक बांधा ॥ मन्मानस बहु रमवितसे ॥ किति० ॥ गायन नर्तन करुनी जनमन ॥ रमविण्यांतही न्यून नसे ॥ किति० ॥ १ ॥

नटी—(गात गात प्रवेश करते)—

पद.—(बासरी बजाइ काना०) ही चाल,

नराधमास पापपुण्य कामवासने पुढें ॥ दिसत नाहिं लवहि क्वचित अंध बनति रोकडे ॥ धृ० ॥ आवडत्या स्त्रियांवरी लोटितात दुःखकडे ॥ परि न त्यांस यदा कथिंच अंतिं नर्कवास घडे ॥ मंदबुद्धि हे कितिक जाणुनी अशांकडे ॥ दीप पतंगासमान होति क्वचित बापुडे ॥ १ ॥

सू०–प्रिये, काय हे विचार चालले आहेत.

नटी०–(बाजूस) अं; माझ्या प्रियांनीं हें भाषण ऐकलें तर नाहींना ! कारण त्यांना असलीं विशेषणें देणें योग्य होणार नाहीं.

सूत्र०–(गळ्यांत हात घालून) प्रिये, तूं ह्मणतेस त्याच-प्रमाणें का सर्व जगांत लोक आहेत.

नटी–छे छे, प्राणनाथ, मी आपणाला उद्देशून बोललें असें नाहीं.

पद.–(जबके कलंदर०) ही चाल.

या जगांतरीं सती स्त्रियांना छळणारेही बहु असती ॥
ऐकुनि त्यांची कृति वदलें मी खेद न माना तुह्मि
चित्तीं ॥ धृ० ॥ ही न धरा प्रिया शंका तुह्मि आपु-
ल्या चित्तांत ॥ पतिव्रता छळुनियां कोणी या जगांत ॥
सुखी असे सांगा सांगा मजसि वृत्तांत ॥ ही न० ॥

सूत्र०–बरें तर, पात्रांची तयारी होईपर्यंत पातिव्रत्यानें वर्तन केल्यापासून केवढें महत्व आहे, या विषयावर कांहीं गायन कर.

नटी–जशी आपली आज्ञा.

पद.–(सुटला पितृदिशेचा०) ही चाल.

असती पतिव्रता ज्या नारी ॥ त्यांनें पाहुनियां अंतरीं ॥
कांपती थराथर सुरही गुणवंता ॥ भय कसलें तें
नच तयां प्रिया भूवरी ॥ असती० ॥ अष्टही दिक्पती
त्यां युवतीतें ॥ पाहुनी वंदिति पदयुग्मातें ॥ यापरी
असेहो जगीं तयांचा महिमा ॥ वदुं किती तुह्मां नच-
सिमा हो महिमा भारी ॥ असती० ॥

सूत्र०–प्रिये, काय बोललीस हें ! तूं एकदां वर्णन करूं लागलीस ह्मणजे झोळीला कामधेनु बनवितेस.

नटी–महाराज, मी यांत आपल्या पदरचें काय बोललें.

पद०—(रामासि अनकूल ०) ही चाल.

किरणें तापेल ह्मणुनी जीला सूर्यहि आपुल्या अंतरिं
भीतो ॥ निव्रवेगानें वस्त्र शरीरीं विखुरे ह्मणुनी
वायुहि भीतो ॥ तत्सम सिंधु, मेरु गिरीही जो तो
आपुल्या अंतरिं भीतो ॥ ऐशा असती पतिव्रता त्या
त्यासहि भारती लेख रचीतो ॥ १ ॥

ऐकलेंत; पातिव्रत्यानें वागणाऱ्या स्त्रियांवर कितीही संकटें आलीं तरी त्यांतून त्यांना ईश्वर पार पाडतोच.

" पडद्यांत—" वाहवा ! ईश्वर करो आणि आमची जी महापतिव्रता भुवनसुंदरी ती या आलेल्या संकटांतुन मुक्त होवो.

नटी—(ऐकून) प्रिया, हें कोण बोलत आहे बरें ! भुवनसुंदरी हें नांव आपल्या क्रुरसेन महाराजांचे कनिष्ठ बंधु प्रतापचंद्र यांच्या पत्नीचें आहे. तर तिच्यावर आलेल्या संकटांची काळजी घेणारा हा कोण असावा बरें.

सूत्र०—(पाहून) तो पहा सरकारचा कंचुकी विनयवसु इकडेसच येत आहे. मला वाटतें राजघराण्यांत कांहींतरी घोंटाळा दिसतो—खरोखर प्रिये—

साकी.

संपत्तीच्या मदें मूढ नर अनर्थ करिती लोकीं ॥
विनाकारणें सत्वशील जन येणें पडती शोकीं ॥
नियमची हा साचा ॥ प्रत्यय पाहुं खल याचा ॥
॥ नियम० ॥ १ ॥

(सूत्रदार व नटी निघून जातात.)

ही प्रस्तावना झाली.

(विनयवसु कंचुकी प्रवेश करतो.

वि० कं०—(सखेद प्रवेश करून) आतां भुवनसुंदरीचें रक्षण तिचें पातिव्रत्यच काय करील तें खरें. आमचे क्रूरसेन महाराज ह्यांच्या नांवाप्रमाणें त्यांची करणी आहे, हें तर जगप्रसिद्ध आहेच आणि तशांतून आतां तर—

पद.–(अंगिकार करुनि हिचा०) ही चाल.

भुवनसुंदरीवरीच प्रेम वाढलें ॥ नर्कवास प्राप्त करुनि घेतसे बळें ॥ मिळेल अशा ऐनसमयीं कोण नर- मणी ॥ क्षणक्षणीत अंजन नें नयनिं घालुनी ॥ सुप- थिं नृपा लावि असा मान्य या जनीं ॥ विषयांधा न्याय नीति तिळहि नच कळे ॥ १ ॥

कारण भुवनसुंदरी ह्मणजे धाकटी भावजय आणि तिचेविषयीं पापबुद्धि धारण करणें हें किती नीच कर्म आहे. अथवा हेंच खरें कीं,

पद–(स्फटिकाचे हे पद०) ही चाल.

*सुंदरपणा हा तरुण स्त्रियांचा ॥ चुंबक मणी जणुं कामि नरांचा ॥ ध्रु० ॥ बनला आहे किति गमतीचा ॥ विषयांधाला शांतिसुखाचा ॥ तारुण्यांतिल सौंद- र्याची ॥ चमक मूर्ख करी चतुरही साचा ॥ १ ॥

असो, पण ह्या गोष्टीचा परिणाम फारच घातक होईल. कारण भुवनसुंदरी महासाध्वी आहे. ती लागलीच शाप देऊन भस्म करील. तसाच तिचा पति ह्मणजे एक अद्वितीय वीर आहे. त्याला कळल्याबरोबर तोही क्षणाचा विलंब न करितां एक घाव दोन तुकडे करून टाकील. तर आतां क्रूरसेन महाराजां- वर आपली छाप बसवील असा उपदेशक तरी कोण पहावा? (इतक्यांत सुविचार येतो त्याला पाहून) वाहवा यथायोग्य पुरुष येत आहे. खचित हा—

चंद्रनीतील.

महारोगिया अमृत जसें ॥ हरिनामचि कीं पापा जैसें ॥ तैसा उच्छेदक हा दिसे ॥ दुष्टबुद्धीचा ॥ १ ॥

(पुढें होऊन) कोण सुविचार.

सुविचार–(पाहून) कोण विनयवस्तु, अरे तूं राजाच्या अंतः–

पुरांतला मनुष्य असून भलत्याच वेळीं या ठिकाणीं कसा आलास.

विनयवसु—मी तर या वेळीं तुझ्याच शोधांत आहें.

सुवि०—काय, माझ्या शोधांत कां बरें ?

वि०कं०—सुविचारा, तूं मोठा शहाणा, चतुर, प्रसंगानुरूप वर्तन करणारा आणि पापभीरू असून आमच्या सरकारचा पूर्ण विश्वासु आहेस.

सुवि०—तुझांला काय वाटत असेल तें खरें.

वि० कं०—आम्हांलाच काय, पण आमच्या एकंदर मंडळींत तुझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं असें सर्व मान्य करतात.

सुवि०—असेल, तसें असेल.

वि० कं०—आहेच तसें.

सुवि०—तुह्मी ह्मणा, पण एखादा प्रसंग येऊन तो माझ्याच हुशारीनें दूर होईल तर मी खरें ह्मणेन.

वि० कं०—प्रसंग तर आलाच आहे. आतां आपली कर्तबगारी दाखीव ह्मणजे झालें.

सुवि०—बरें, प्रसंग कोणता तें तर कळूंदे.

वि० कं०—ये इकडे, तुझ्या कानांत सांगतों. (तसें करितो).

सुवि०—अरेरे ! फार वाईट ! फार वाईट ! ! फार वाईट!!! शिव शिव, किती तरी दुष्ट मदन हा.

पद—(उत्कर्ष स्वामिंचा०) ही चाल

सहस्त्रावधि भ्रष्टविल्या कुलिन त्या स्त्रिया ॥
शेंकडों तपोधनांचि तपेंही ने लया ॥ धृ० ॥
जनक, सुता, बहिण भाऊ, गुरुचि कामिनी ॥
कित्येकांस भेद न दे यांत पहावया ॥ सह० ॥ १ ॥

वि० कं०—तूं जें ह्मणतोस तें अक्षरशः खरें आहे. जगांत जे मोठमोठे अनर्थ होऊन गेले त्याला हा मदनच कारण होय.

सुवि०-म्हणूनच मी म्हणतों कीं या कामांत ब्रह्मदेवाक-डूनही उपाय होणें कठीण.

वि० कं०-पण आतां असेंच म्हणून स्वस्थ बसायचें का ?

सुवि०-छे, छे, तसें तर नाहींच.

वि० कं०-चल तर मग आतांच तुझी आणखी महाराजांची गांठ घालून देतों, मग तुला वाटेल तसा तूं प्रयत्न कर.

सुवि०-ठीक आहे. पण सांप्रत ते कोठें असतील.

वि० कं०-बहुधा ते भुवनसुंदरीच्या महालाभोंवतीं असलेल्या वृक्षवाटिकेंत हिंडत असतील. ये असा माझ्यामागून.

(हा विष्कंभक झाला)

(वर दर्शविल्याप्रमाणें राजा क्रूरसेन प्रवेश करतो.)

क्रूर० रा०-(प्रवेश करून)

पद [रसिकेवरती तल्लिन मन०] ही चाल.

माझी इच्छा मोडिल ऐसा मानव न दिसे मज
कोणी ॥ देवदानवां दुर्लभ तें सुख भोगिन आतां या
भुवनीं ॥ ध्रु० ॥ भुवनसुंदरी मदनमंजरी ॥ नांदते
सदा हृदयमंदिरीं ॥ नयनीं खेळते परि न ये करीं ॥
नाहिं राहिला धीर अंतरीं ॥ दिनरजनीं तळजनीं ॥
रंगुनि गेलों मी म्हणुनी ॥ माझी० ॥

असो, माझी ही गुप्त गोष्ट कोणाला कळतां उपयोग नाहीं.

(इतक्यांत सुविचार व कंचुकी प्रवेश करतात.)

वि०कं०-(पाहून) सुविचारा, ते पहा महाराज बहुधा आपलें कार्य कसें साधावें याच विचारांत आहेत. हो तूं पुढें मी जातों. (जातो)

क्रूर०रा०-(सुविचारास पाहून) अरे हा सुविचार, याचे कान फार तिखट असून हा मोठ्या कुशाग्रबुद्धीचा मनुष्य आहे. म्हणून याला या कृत्याचा अगदीं मागमुस सुद्धां लागूं

देतां कामा नये. (उघड) कोण सुविचारा, अरे होतास कोठें इतके दिवस.

सुवि०—सरकारच्या पायांपाशींच होतों.

क्रूर० रा०—(मनांत) हा माझ्या पायांशींच होतों असें ह्मणतो तर ह्याला माझें गुह्य कळलें असेल. (उघड) पाया पाशीं होतास तर सांग माझ्या मनांत काय आहे तें.

सुवि०—मी पायांपाशीं होतों मग मनांतलें कसें सांगू.

क्रूर०—हें तरी खरें बोलतोस.

सुवि०—मी कधींतरी कोणाजवळ खोटें बोललों आहें का ?

क्रूर०—हो खरेंच तें. (बाजूस) हा खोटें कधींच बोलत नाहीं आणि माझ्या मनांतली गोष्ट याला कळली नाहीं हेंही ठीकच झालें असें ह्मटलें पाहिजे. (उघड) सुविचारा, तुला दुसरें कांहीं काम असेल तर जा.

सुवि०—(स्वगत) कंचुकीनें सांगितलेलें येथें जुळतें खरें. (उघड) आपली सेवा करायचें हेंच माझें काम.आपण जिथें, तिथेंच मी असणार.

क्रूर०—(स्वगत)हा मोठा धूर्त आहे. याच्याशीं या गोष्टीची वार्ताही बोलतां कामा नये. आतां येथें भलत्याच विषयांचा उपक्रम करावा. (उघड) सुविचारा. ये तर मग या मनोहर वृक्षवाटिकेंत अंमळ हिंडूं. (तसें करतात.)

क्रूर०—

पद–(व्यर्थ कशाला रडतां पडतां) ही चाल.

वृक्ष पहा हे रमणीय कितितरी ॥ नयनां देती तोष अती ॥ अरे नयनां० ॥ नूतन पल्लव फुटलेले हे ॥ प्रेमभरानें जणुं डुलती ॥ अरे प्रेम भरा० ॥ फलभारानें लवलेले किती ॥ कुसुमगंधही बहु देती ॥ अरे कुसुम० ॥ १ ॥

सुवि०-खरें आहे. हें पहा आणखी-

पद-(या उपवनिंची सुंदर शोभा०) ही चाल.

तरुण तरुण हे तरुवर नयनीं ॥ योग्य अशा ह्या
वेली तरुणी ॥ अवलोकिती मनीं प्रेमा धरुनी ॥
तरु० ॥ धृ० ॥ तसेच भ्रमरही प्रिय भ्रमरींला ॥
संनिध आपुल्या ओढायाला ॥ यत्न करिति किती
मम चित्ताला ॥ मोद होतसे यांना पाहुनी ॥ तरु०॥

क्रूर०-सुविचारा, खरोखर हा आमचा वृक्षसमूह फारच सुंदर दिसतो. मी याचें भुवनसुंदर नांव ठेवणार आहे.

सुवि०-ठीकच आहे, आपल्या बुद्धिरूप भुवनसुंदरीस आवडला तो भुवनसुंदर कसा नाहीं होणार.

क्रूर०-(विसरून)—

दिंडी.

नाहिं आवडला भुवनसुंदरीला ॥
प्रेम न फुले त्या मदनमंजरीला ॥

(दचकून) अरे मी हें काय बोललों.

सुवि०-(मनाशीं) उत्तर देण्याची हीच वेळ आहे. (उघड) आपण इतकेंच बोललांत कीं भुवनसुंदरीला आवडला नाहीं.

क्रूर०-(चपापून) बरं तर यावरून तूं काय समजलास ?

सुवि०-जें महाराज बोलले तेंच मी समजलों.

क्रूर०-

पद-(सुखोपभोगा योग्य०) ही चाल.

भुवनसुंदरी कोण असे रे कोणा आवडली ॥

सुवि०—वदलां जो तुम्ही तीच कामिनी मज
अंतरिं कळली ॥

क्रूर०-ह्यानें माझें सारें बिंग फोडलें. (उघड) असो, पण—

मज आवडली असें नाहिंना ठसलें तव हृदयीं ॥
सुवि०—कां नाहीं हो ठसलें वदतां संशय नच कांहीं ॥
क्रूर०—प्रतापचंद्राची स्त्री ऐसें कळलें का कांहीं ॥
सुवि०—नांव तिचें तुम्हि वदनीं घेतां कळलें मज तेंहो॥१॥

क्रूर०–(मनाशीं) अरेरे ! घात झाला तर मग. (उघड) कायरे पण हें तुला कसें समजलें.

सुवि०–मी महाराजांचा विश्वासू असल्यामुळें त्यांनीं होऊनच हें मला सांगितलें.

क्रूर०–बरें तर सुविचारा, कागदावर लिहिलेलें, जसें खोडून टाकतात तसेंच हें मी सांगितलेलें खोडून टाक.

सुवि०–आपल्या मनांत जें वागत आहे तें खोडून टाकलेंत कीं माझ्या मनांतलें खोडल्यासारखेंच आहे.

क्रूर०–ह्यानें माझें खरें इंगित जाणलें, तर आतां याच्याशीं कांहींच गुप्त ठेवूं नये. (उघड) गड्या सुविचारा, तूं माझ्या विश्वासाचा, म्हणून मी बुध्याच तुला कळविलें. पण आतां तूं माझें काम साध्य करून दिलें पाहिजे.

सुवि०–आपलें काम तरी कोणतें.

क्रूर०–(उद्वेगानें)

पद.–(अरे मुवे छोड मुजे० ही) चाल.

भुवनसुंदरीवरीच प्रेम मदीय वाढलें ॥ धृ० ॥ अन्य तिच्याविण ॥ त्राण नसे मज ॥ शून्य सकल भासतसे जगत मजसि त्यामुळें ॥ ज० ॥ साध्य मला ती ॥ करुनि आज देईं ॥ नाहिं अगि सौख्य तुझें सत्य सत्य राहिलें ॥ सत्य० ॥ १ ॥

सुवि०–महाराज, पण हें मोठें पाप आहे.

क्रूर०–

पद.–(रुचतो कां तीर्थयात्रा०) ही चाल.

पापाचा पाड येथें नच कधिंही मी मणी ॥ कळल्या

भीत नाहीं मी किमपी या जनीं ॥ न्यायाची थोरवी ती नच ढळते मुळिंहुनी ॥ नीतीला मनिं थारा नच रमणी वांचुनी ॥ १ ॥

सुवि०—मग काय आपण समर्थच आहांत.

दिंडी.

शक्तियोगें होईल साध्य सारें ॥ परि युक्ती मोल खरें बारे ॥ ह्मणुनि कथितों मी काइ युक्ति नामी ॥ प्राणप्रिय मानीन रे तुला मी ॥

सुवि०—महाराज, मी आपलें अन्न खाऊन वाढलों आहें, ह्मणून आपलें काम मला केलेंच पाहिजे; तसें माझेंही एक आपण ऐकलें पाहिजे.

क्रूर०—जें मागशील तें तुला देईन आणि लिला तर प्राणही अर्पण करीन.

सुवि०—मी तेंच सांगणार. ह्मणून ह्मणतों कीं—

पद—(नृपममता रामावरती०) ही चाल.

हें कर्म निंद्य जगिं भारी ॥ विष दुर्धर ती परनारी ॥ नृपवरा ॥ पतिव्रता छळुनि संसारीं ॥ नर वांया गेले भारी ॥ नृपवरा ॥ चाल ॥ धरिं जरा ॥ न्याय मनिं बरा ॥ उमजरे पुरा ॥ पडरि कांतारीं ॥ दे सोडुनि कुबुद्धि सारी ॥ नृपवरा ॥

क्रूर०—

चाल सदर.

उपदेशा ज्ञानबोधाचा ॥ उपयोग कायरे साचा ॥ नच रुचे ॥ त्या सुंदरीविण देहाचा ॥ येतसे वीटरे साचा ॥ नच रुचे ॥ अंतरीं ॥ धीर नच करीं ॥ आस मम पुरी ॥ तरिच प्राणाचा ॥ तूं सखा होसिरे साचा ॥ नच० ॥

सुवि०–मी आपला बंदा चाकर आहे पण—

पद–(बंजाऱ्याच्या चालीवर)

नृपवरा कंठ चिरण्याला ॥ सांगशी कसा रे मजला ॥
नृपवरा ॥ करुं कसें नीच कामाला ॥ वचकंटक
हतले मजला॥ नृपव० ॥ परनारी करितां मेले ॥ राव-
णादि विलया गेले ॥ कां जाळिशि कुळ तूं आपुलें ॥
हा सुबोध माझा ऐक ॥ व्यर्थ हा शोक ॥ हंसेल
तुजला लोक ॥ उमज भूपाला ॥ जा शरण प्रभुपद-
कमला ॥ नृपवरा० ॥

क्रूर०–(मनाशीं) शल्यानें जसा कर्णाचा तेजोभंग केला, तसाच हा मूर्ख माझा तेजोभंग करणार आहे. याला कळलें हेंच वाईट झालें. असो. आतां याचेवर रागें भरून तरी पहावें काय होतें तें. (उघड) सुविचारा—

पद—(झंपा.)

मूढा भंगिली माझि आज्ञा ह्मणोनी ॥ लाथही खाउनी
जा इथोनी ॥ धृ० ॥ अन्न मम जें तुवां
आजवरि सेविलें ॥ फेडिलें योग्य हें सकल उसनें ॥
वदन दाऊं नको हें मला आपुलें ॥ पहावेना तुजसि
नयनीं ॥ मूढा० ॥ १ ॥

सुवि०–(जातां जातां)

पद—(झंपा.)

नसे भंग हो खचित या सुपथ गमनीं ॥ कुपथिं
होते सत्य ती सकल हानी ॥ धृ० ॥ अन्न देतील हे
आपुले पद मला ॥ सोडिली अवघिही आज सेवा ॥
काशीयात्रा सुखें करिन मी निश्चयें ॥ चाललों
स्वामि आतां इथोनी ॥ नसे० ॥ १ ॥

(जातो.)

क्रूर० से०–(गेलासा पाहून) काय मूर्ख बेटा, मलाच बोध करतो. (थांबून) अहाहा ! मी किती सुंदर पुरुष, आणि तीही अगदीं मला कशी तंतोतंत योग्य आहे. असो. आतां आजचेआज हें कार्य साधलें पाहिजे. (चपापून) वाहवा! मी अगदीं तिच्या महालाजवळ येऊन पोंचलों ! विचार करून हो, कदाचित् तिचा पति येथें असेल, तर त्याचा प्रथम शोध केला पाहिजे. (पुढें होऊन) कोण आहेरे दरवाज्यावर.

मानाजी–(हात जोडून) जी सरकार, मी मानाजी आहें.

क्रूर० रा०–मानाजी, प्रतापचंद्र आंत असेल तर त्याला हिकडे घेऊन ये.

(मानाजी आंत जातो व प्रतापचंद्रासह परत येतो.)

प्र० चं०–दादा, काय आज्ञा आहे.

क्रूर०–(चपापून) अरे हा मंदिरांतच होता ! आतां याला मी काय सांगूं (विचार करून) प्रतापचंद्रा, तुझें दरबारापेक्षां मंदिराकडे ज्यास्त प्रेम आहे.

प्र० चं०–नाहीं दादासाहेब, असें कसें बरें होईल. माझें लक्ष दरबाराकडेच ज्यास्त आहे.

क्रूर०–(मनाशीं) पुढें काय बोलूं ? हो, आतां असेंच केलें पाहिजे. (उघड) बरें प्रतापचंद्रा, दक्षिण सरहद्दीच्या डोंगराळ प्रदेशांत कोळी लोकांनीं दरोडे घालण्याचा क्रम मोठ्या जारीनें चालविला आहे, तर त्याचा कांहीं बंदोबस्त केलास का ?

प्र० चं०–तिकडे परवांच सैन्य पाठविलें आहे.

क्रूर० रा०–तुझें चित्त दरबाराकडे असेल, तर ना तुला तिकडची खबरबात कळेल. नुकताच त्यांनीं सरहद्दीवरचा किल्लाही लुटून फस्त केला, अशी बातमी मला आतांच एका हेरानें येऊन कळविली. ह्मणून मी इतक्या गडबडीनें येथें आलों आहें.

पद.-(जी जन्मनातें रमविण्या०) ही चाल.

आ-त्वरित समरीं वधुनि टाकीं सकल त्या अरिंला ॥
घे-विपुल सैन्यहि सर्व आपुल्या समरीं साह्याला ॥
बी-मोड झाल्यावीण नचरे उठवि ठाणाला ॥

प्र०चं० (त्वेषानें)

हा-जाउनीयां अरिस नेतो त्वरित विलयाला ॥ हे-
शब्द ऐकुनि स्फुरण चढलें खचित बाहूला ॥ मी-
भीत नाहीं पाड त्याचा काय भूपाला ॥

कूर०-

हा-क्षत्रियाचा धर्म आहे सत्यरे प्रबला ॥ हो-विजयि
आपुल्या शौर्यतेजें दिपविं सकळांला ॥ १ ॥

बरें तर मी येतों.आजचेआज ही व्यवस्था झाली पाहिजे.(जातो)

प्र० चं०-(कांहीं चालून) मानाजी, रामदिनला बलावून आण.

माना०-(हात जोडून) आज्ञा सरकार. (जातो व रामदिनासह येतो)

रामदि०-(मुजरा करून) महाराजांचा जयजयकार असो

प्र० चं०-रामदीन, दक्षिण सरहद्दीकडे आतांचे आतां जावयाचें आहे. तर लौकर सर्व तयारी करा.

रामदी०-जो हुकुम. (मुजरा करून जातो).

प्र०चं०-रामदीन तयारी करीपर्यंत प्रियेची भेट घ्यावी (पाहून) वा ! ही येथेंच उभी आहे. प्रिये, ये अशी दूर कां उभी.

भु०सु०-(सलज्ज) भावोजी बोलत होते म्हणून मी दूर उभी राहिलें,

प्र०चं०-तर मग दादासाहेबांचा हुकुम ऐकलाच असेल.

भु०सु०-हुकुम असला म्हणून कांहीं स्वतःच जायला नको.

प्र०चं०-वाहवा स्वतःच गेलें पाहिजे. असा हुकूम आहे.

भु०सुं०—बरें चला. नाहीं कोणाची आहे. ही मी पण तयारी करतें.

प्र०चं०—भलतेंच एक दोन दिवसांत मी परत येणार.

भु०सुं०—मग काय तयारी नको ह्मणतां ? अशीच येऊं. ठीक आहे एक दासी मात्र बरोबर घेतें.

प्र०चं०—पण तूं कशाला येणार ?

भु०सुं०—हें काय बाई. मी नाहीं येथें एकटीच राहव-याची काय तरी—

पद.—(आपने दिलभरियोसें०) ही चाल.

शशि, चंद्रकिरण कधिं कांती त्यागिति कां सख्या ॥
चंदनही तो सौगंधातें नच सोडी किमपिही आ-
पुल्या ॥ निजशोभेप्रती दूर ठेवुनी राहात नसे
हिराही पतिराया ॥ अन्य सुखाचें नच साधन जगिं
निजसंगें न्या मज सुखवाया ॥ शशि० ॥ १ ॥

प्र०चं०—चल, वेडी कोठली. अशा घोर प्रसंगीं बायकां-लाका कोणी बरोबर घेऊन जातात. लोक ह्मणतील तरी काय?

भु०सुं०—लोकांशीं आपणाला काय करायचें आहे.

प्र०चं०—

पद.—(इच्छा माझी पूर्ण करुन मी०) ही चाल.

महाभयंकर रण तें कांतें नाद कडाकड होतो तेथें ॥
धाड धाड त्या वाजति तोफा भूकंपापरिं सकलही
होतें ॥ रणवाद्यांच्या नादें चरचर चिरिती क्रोधें
परस्परांतें ॥ कोमल अंतःकरणाच्या तुजि सहन
करें वद होइल तुज तें ॥ १ ॥

भु०सुं०—असें असेल तर आपणालाही नाहीं मी आड-यायची. (त्याला धरते)

प्र०चं—तर मग तूं वीरपत्नी नव्हेस. क्षत्रियकुलाला

कलंक लावणारी बायको आहेस. चल हो दूर. (तिला दूर करतो).

भु०सुं०—पुरुषांना किं नाहीं दोन्ही कडून बोलतां येतें. एखाद वेळ नेलेंत बरोबर ह्मणून काय झालें घरांत मेलें करमणुकीला तरी कोण आहे,आणि बंगला पाहिला तर गांवाबाहेर आपल्या नांवावर इथं कोणी ढुंकून सुद्धां पाहत नाहीं, पण—

प्र०चं०—अग अशी भितेस कां मला कोठें जाणें झाल्यास बंगल्याभोंवती एकजात स्त्रीसैन्य ठेवण्या करितां मी मुद्दाम तयार करून ठेवलें आहे. आतां बलावून घेतों. कोण आहे मानाजी,

माना०—(हात जोडून) जीसरकार.

प्र०चं०—स्त्रीसैन्याच्या जमादारास बलावून आण.

माना०—आज्ञा. (जातो व स्त्रीसैन्याच्या जमादारासह येतो.)

स्त्री०ज०—(मुजरा करून) महाराजांचा जयजयकार असो.

प्र०चं० जमादार, आजपासून मी परत येईपर्यंत तुह्मी आपल्या सर्व सैन्यासह बंगल्या भोंवती रात्रंदिवस खडा पहारा करीत असा.

स्त्री०ज०—आज्ञा सरकार (जातो).

प्र०चं०—प्रिये,तूं शाहणीच आहेस.ज्यास्त सांगायला नको.

साकी.

क्षण विश्रांती प्रेम सुखाची घेऊं चलगे कांते ॥
विरहदुःख हें तुजसम मजला बहुतचि सलवे खातें ॥ उपाय नच त्याला ॥ स्कंधीं राज्यभार पडला ॥ १ ॥

अंक पहिला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश पहिला (स्थळ रस्ता.)

(क्रूरसेनाचा नोकर चंदु प्रवेश करतो.)

चंदु—(प्रवेश करून)

पद.—(छोरी बामनकी०) ही चाल.

मोठा अधिकार ॥ आहे मोठा अ०॥ तसाच अंगीं
भरपुर भरल्यावरती तो अविचार ॥ मोठा० ॥ ध्रु० ॥
अनंगरंगीं रंगुनि जाती ॥ नाहीं सारासार ॥ विचार
त्यांना कांहीं ऐसा ॥ अगणित मरती ठार ॥ १ ॥

आमचे सरकार क्रूरसेन महाराज हे सांप्रत कामदेवाचे कट्टे भक्त बनले आहेत. तेव्हां आतां ते काय न करतील. भुवनसुंदरी त्यांची धाकटी भावजय असून आज तिच्या महालांत जाऊन ती सामोपचारानें वश न झाल्यास बलात्कार करून आपली कामवासना पुरी करून घेणार ! केवढा हा अविचार किती घोर कर्म हें; असो. आपणाला काय—

पद.—(हुंतो मारवाडनो बनयो०) ही चाल.

आह्मि चाकर आपुल्या पोटाचे ॥ सांगितल्या कामाचे॥हुकुम धन्याचा होइल तैसे वागुनियां त्याचें ॥
काम करी तो राम स्मरुनि मनिं, भय नाहीं काळाचें॥१॥

त्यांच्या हुकुमाप्रमाणें भुवनसुंदरीच्या महालांतील व्यवस्था पाहण्याकरितां गेलों,तों तेथील साऱ्याच गोष्टी आमच्या महाराजांस अनुकूल अशा आहेत. पहाऱ्यावरील स्त्रीसैन्य खुशाल सारगोटयांच्या खेळांत गुंतलें असून एक देखील दरवाजा बंद नाहीं आणि भुवनसुंदरी तर या वेळीं नित्यनियमाप्रमाणें श्रीकालिकेची आराधना करीत एकटीच बसली आहे. तरी

अशा प्रकारची ही शुभवेळा साधा ह्मणून क्रूरसेन महाराजांस सांगण्याकरितां लौकर गेलें पाहिजे. (जातो)

(भुवनसुंदरी देवीमंदिरांत देवीची पूजा करीत आहे असा पडदा उघडतो)

भु० सुं०—(पूजा करून) हे पतिव्रतेच्या कुंकुमतिलके, भवजालभंजने, कात्यायनि, माझा तुला प्रणाम असो—

पद.—(ये रंगी रंगे तूं०) ही चाल.

ये SSSSS अंबे अंबे तूं सांब सदाशिव शोभविलें
अर्धांग जगज्जननी विश्वकदंबे ॥ ये अंबे ॥ धृ० ॥
तव गुण गाती सुरवर मुनिजन प्रेमानंदें दिनरजनीं ॥
ब्रह्मांडांगणीं खेळ खेळशी नेणें महिमा शिवही सांग
शुभांगी, अंबे ॥ ये० ॥ १ ॥

इतक्यांत क्रूरसेन प्रवेश करितो.

क्रूर०—(तिच्याकडे लक्षपूर्वक पाहून) वाहवा ! कितीतरी नाजुक वस्तु ही. माझ्या लमाच्या वेळीं कुठें दडाली होती कोण जाणे. खरोखर—

दिंडी.

ब्रह्मदेवानें कल्पना करोनी ॥ सकल सुंदरता सार
करिं धरोनी ॥ मनें चिंतुनि रचियली मूर्ति हीची ॥
ह्मणुनि सुंदर इतुकी साच हेची ॥ १ ॥

असो आपला हेतु अद्याप हिला मुळींच कळला नाहीं.करितां प्रतिष्ठितपणानें पुढें जायला संकोच नको. (ऐटींत पुढें जातो.)

भु० सु०—(त्याला पाहून बावऱ्या बावऱ्या) अग बाई, आज अशी एकाएकीं स्वारी कां आली ? बहुधा माझा समाचार घ्यावा आणि त्यांतल्यात्यांत देखरेखही करावी, हाच हेतु असेल, पण तिकडील कांहीं वर्तमान नसेल ना ? कांहीं असो.

पद (मांड—दादरा.)

सुखरूप असो प्राणपती समरिं रहो भरी ॥ वाढो

सौभाग्यराशी तारि कींकरी ॥ ध्रु० ॥ शक्तिबळें
मनुज सुवां बहुत तारिले ॥ भारतयुद्धांत अर्जुनासि
यश दिलें ॥ चंड मुंड खंड करुनि सुरहि रक्षिले ॥
अन्य मला साह्यकारि नच जगांतरीं ॥ १ ॥

असो, आतां हिच्याशीं भलतं सलतं तरी बोलूं नये.(जरा शांत बसून) भुवनसुंदरी, बरी खुशाल आहेसना ? प्रतापचंद्राकडून खुशालीचा निरोप आला ह्मणून मी मुद्दाम तुला कळविण्या करितां आलों. ह्मटलें समाचार घ्यावा आणि खुशालीचें वर्तमानही द्यावें. बहुतकरून सकाळ संध्याकाळ येईलच.

भु०सुं०—(स्वगत) आई जगदंबे, सुखरूपपणाचें वर्तमान ऐकलें, येणेंकरून मी तुझी आभारी आहें.

क्रूर०—(स्वगत) ही कांहींच बोलत नाहीं आणि तोंडही दाखवीत नाहीं, तर आतां आपण येथून पाय काढावा हेंच योग्य. (उठून) बरें जातों तर मी आतां.

भु०सुं०—(मनाशीं) काय करावें, कोणी जवळ मनुष्यही नाही बोलावें तर द्वांडगी ह्मणतील, न बोलावें तर समाचाराला गेलों असतां बोलली पण नाहीं, कसें करावें. बोलतेंच आतां कांहीं. (उघड) कां, इतकी घाईशी.

क्रूर०रा०—(मनाशीं) अहाहा ! बोलली रे बोलली मदनाच्या तीव्र वेगानें मला येथें आणलें आणि येथें येऊन ह्या नरसिंह मूर्तीला पाहतांच तो पिच्छ मदन कोणीकडल्या कोणीकडेच पळून गेला होता, पण अंमळ हिनें मधुर भाषण करून त्याला पुन्हां धरून आणिलें.

पद.—(सुने दिलदार गुल०) ही चाल.

मधुर वाणी श्रवणीं पडतां धीर आला ॥ प्राण त्यजा
तोच चित्तीं बहुत झाला ॥ ध्रु० ॥ अभिनय ते अशा
सवर्णी बघुनि हीचे ॥ मदन राजा हृदयिं प्रेमें रुचिर

फुलला ॥ तन मन धन सुजन यांची नसे पर्वा ॥
सुखद ठेवा विधात्यानें मला दिधला ॥ १ ॥

पण आपल्या हेतु प्रमाणें बोलण्याला आरंभ कसा करूं ?

भु०सुं०—बसा तरी अंमळ.

क्रू०से०—(स्वगत) अहाहा ! किती तरी चमत्कारिक मुरका मारलान हा—

पद.—(लग्नाला जातों मी०) ही चाल.

मोरा सम मान हिनें रम्य फिरवुनी ॥ चोरियलें हृदय
अहा! धीर नच मनीं ॥ धृ० ॥ वक्र कटाक्षास पात्र ॥
केलें मज आज मात्र ॥ परि देउनी अधरामृत ॥
करिल कधीं मजसि तृप्त ॥ धन्य युवतिरत्न असें
हेंच या जनीं ॥ १ ॥

(उघड) भुवनसुंदरी, बसायला कांहीं हरकत नाहीं. पण येथें तिसरें कोणी नसल्याकारणानें माझें मन संकोच पावतें.

भु०सुं०—संशय खरा, पण राजानें प्रजाजनांची एकांतींच गांठ घेऊन प्रजाजनांचीं दुःखें विचारलीं पाहिजेत. तेव्हां आपणाला कोणाशींही एकांतीं बसायला हरकत नाहीं.

क्रू०से०—(मनाशीं) बरोच रंगांत आली. आतां आपला डाव फेंकायला सुरवात करावी. (उघड) भुवनसुंदरी, तूं अकलेनें व सौंदर्यानें सर्व स्त्रियांत श्रेष्ठ आहेस. तर तसेंच मानानेंही तुला श्रेष्ठ करावें, अशी माझी इच्छा आहे.

भु०सुं०—(घोंटाळल्यासारखें मनांत) स्वारीच्या मनांत तपोवनांत जायचें आहे कीं काय ? किंवा आम्हांला राज्याचा विभाग तोडून देणार, कांहींच कळत नाहीं. (उघड) आपण काय म्हटलें तें मला कळलें नाहीं.

क्रूर०—तुला राणी करावें असें माझ्या मनांत आहे.

भु०सुं०—आपण तपोवनांत जाणार कीं विभाग करून आम्हांला वेगळें काढणार.

कू०से०—भुवनसुंदरी, विचारतेस म्हणून सांगतों ऐकशील ना,

भु०सुं०—मी आपली आज्ञा कधींतरी मोडली आहे का ? न ऐकेन तर कान धरण्याचा आपला अधिकार आहे.

कू०से०—ऐक तर-

साकी.

रतिमदनाहुनि अधिक चांगला जोडा हें तूं जाणें ॥
श्रीदेवीचें जें हें मंदिर मदनाचें करुं ठाणें ॥ सेवूं
सौख्याला ॥ येईल फल तुज वेलीला ॥ १ ॥

भु०सुं०—(तिरस्कारानें मनाशीं) अरे दुष्टा, चांडाळा ! केवढा हा पालथ्या काळजाचा मनुष्य तरी. तरीच मी म्हटलें ही स्वारी एकटीच कशी आली ! याच्या मनांत हा काळापात करायचा आहे. असो, आई जगदंबे, तूंच आतां त्राती आहेस.

कू०से०—सुंदरी, बोलत कां नाहींस. अग, राणी ह्या पदाला तुझें रूप अनुरूपच आहे. (तिला धरायास जातो.)

भु०सुं०—(त्याला झिडकारून)

पद.—(हं मदंगा लावुं नका कर०) ही चाल.

ही जळो तव वाणि मूढा ॥ चल जा म्हणुनी ॥
आपुल्या सदनीं ॥ कांहीं तरी धर लाज मनीं ॥
चल जा० ॥ धृ० ॥ १ ॥
कूर०—मदन जाळितो या मम तनुला ॥ म्हणुनी आलों
तव सदनाला ॥ शांत करीं गे झडकरि मजला ॥
भु०सुं—वैभव जाळिल जाण मनीं ॥ परनारि जनीं ॥
खरि दुःख खनी ॥ कांहीं तरी० ॥ चल जा० ॥ १ ॥
कूर०—तुजसाठीं तें जळो सर्वही ॥ पर्वा त्याची मजका
नाहीं ॥ प्रेमें आलिंगनसुख देईं ॥
भु०सुं—मृत्युमुखीं पडले वदनीं ॥ ऐसें वदुनी ॥ तुज
कोण गणी ॥ कांहीं तरी० ॥ चल जा० ॥ २ ॥

कूर०—अग ते होते बहु अविचारी ॥ लावुं नको मज
त्यांची थोरी ॥ मी न तसा हें जाण निजांतरीं ॥
भु०—मज कळलें तूं बहुत गुणी ॥ चल जा० ॥ २ ॥
कू०से०—विनोद आतां पुरे करीं हा ॥ मत्कारिं दे तव
रतिसुख सेवा ॥ सेविन प्रेमें मानुनि मेवा ॥
॥ चाल ॥ दया नये कां तुज अजुनी ॥ वद मृदु
वचनीं ॥ तूं नीच जनीं ॥ काहिं तरी० ॥ चल० ॥

(जाऊं लागते.)

कूर०—कोठें जाशील, दारानां कुलपें ठोकलीं आहेत.

भु० सुं०—(पाहून) खचीत काळापात हा.

कूर०—भुवनसुंदरी, अजून किती अंत पाहतेस.

भु० सुं०—

पद.—(जळो तव वाणी०) ही चाल.

काय ही नीती ॥ कोंडिली गाय या रीतीं ॥
कू०से०—आहे दुराग्रही कसला मी ॥ बलाढ्यहि सकल
महीचा स्वामी ॥ हेतु पुरवुनि घेईन नामी ॥
भु०सुं०—कांहिं तरी चित्तीं ॥ उमजुनि सोडरे कुमती ॥
काहिं० ॥ १ ॥
कू०से०—प्रेमानें ज्या होतिल गोष्टी ॥ त्यांतचि सौख्य
असे दे दृष्टी ॥ वायां होऊं नको मनिं कष्टी ॥
भु०सुं०—भवदसा पूर्ती ॥ ही आलि तुला रे कुमती ॥
काहिं० ॥ २ ॥
कू०से०—माझी इच्छा पूर्ण न करितां टाकिन वधिल
हं हे म्हणतां ॥
भु०सुं०—नी अंबा तुज देईल लाथा ॥ पडशिल अंतीं ॥
नरकीं कैंचि यमप्राप्ती ॥

कूर०—काय, तुझी आमि नाहीं होणार ? कशी नाहीं होत
ती पहातों. (तिला धरावयास जातो.)

भु० सुं०—(भयानें सैरावैरा धांवते.)

पद.—(लाथ मारुनि जगिं०) ही चाल.

अधम पातकि उठलासे हा धांव धांवे शंकरी ॥
दीन कन्या रक्षिं सदये प्रबल अरि हा संहरी ॥
जनक जननी बंधु तैसे इष्ट मित्रहि सोयरीं ॥
तूंच जाणुनि चरणिं प्रेमें शरण आलें किंकरी ॥
अधम० ॥

(देवीच्या पुढें निश्चेष्ट पडते, तोंच कडकडाट होऊन एक उग्र पुरुष प्रगट होतो व क्रूरसेनास गुप्तरूपानें खालीं पाडतो.)

कराल—मी या देवीचा कराल नामा गुप्त संचारी दूत आहे. तिनें मला अशी आज्ञा केली आहे कीं, या भुवनसुंदरीला ताप देणाराचें तूं गुप्त रूपानें वेळोवेळ पारिपत्य करीत जा. त्या प्रमाणें मी तिरस्कारिणी विद्येच्या सामर्थ्यानें येथें प्रगट होऊन या नीच क्रूरसेनास तर ठार केलेंच. आतां आपण आपल्या कामाला जावें. (जातो).

भु० सुं०—(सावध होते व क्रूरसेनाकडे पाहून) अं हें, काय झालें अरेरे ! कायही याच्या जिवाची तरफड होत आहे. प्राण जातो वाटतें.(हात लावून)हाय हाय ! झाला थंड गार झाला. शिव शिव ! बायकांचें हृदय तरी किती कोमल हें. हा एवढा चांडाळ आहे तरी याची ही अवस्था पाहून पोटांत अशी आग उसळूं लागली आहे. याचें पातकच याला मारक झालें. (विचार करून) परंतु झालें हें ठीक नाहीं. कारण राज्य मिळण्याच्या आशेनें मीच हें घोर कृत्य केलें असा लोकापवाद मजवर येणार, करितां आपणही आपलें शिरकमळ या जगदंबेच्या पाई अर्पण करावें हेंच योग्य.

पद—" जन्म कां वृथा दिला० " ही चाल.

अंबिके वदिं मला ॥ ठाव दे अधांगिला ॥ हो अं० ॥

पूजिलें तुज प्रेमभरें ॥ फळ त्याचें हेंच बरें ॥ सौख्य धामि नेई त्वरें ॥ पूर्ण भास पातला ॥ हो अं०॥ जन्म आज संपला ॥ दोषा दोषा दिला ॥ ठावुके असति परी ॥ लोकिं बोल राहिला ॥ होअं० ॥

(देवीच्या हातांतील तलवार आपल्या हातांत घेऊन) या वेळीं मी लोकापवादाला भिऊन देहत्याग करीत आहें. असो, जगदंबे, आमची उभयतांची प्रीति कशी आहे हें एक तूं कीं आम्हां उभयतांचीं मनें जाणत आहेत. पण ह्यांच्या प्रपंचाचा बिघड करूं देऊं नको हो. झालें माझें सांगणें आतां या तुझ्या हातांतल्या तरवारीनें मी आपलें शिरकमळ तुझ्या पदीं वाहतें.(मानेवर वार करणार तोंच कडकडाट होऊन देवी प्रगट होते.)

देवी—(तिच्या हातांतील तरवार धरून)

पद—(हा कसारे उलटा धंदा०) ही चाल.

हं हं विमले मत्प्रिय कन्ये ॥ हं हं० ॥ ध्रु० ॥ कां करिसी गे साहस ऐसें ॥ निंद्य असे जगिं हें तव मरणें ॥ तुला छळियलें त्या अधमाला ॥ दुर्गति दिधली पहा नयनानें ॥ प्राण कशाला व्यर्थ त्यागिशी ॥ पतिसह सुख घे त्यजिं हें करणें ॥ १ ॥

भु०सुं०—

पद—(प्रिय अबलेचा छळ०) ही चाल

हे जगदंबे आई भवानी ॥ वंदितसें तव पाय नृपती सजीव करीं हा विमले ॥ ध्रु० ॥ छळिलें अपकारें जरि यानें ॥ तरि मी उपकारच मनिं जाणें ॥ कारण सुरमुनी कष्टति ज्याला ॥ दर्शन तें तव आज मजला याच प्रसंगें घडलें ॥ १ ॥

देवी—

पद—(चाल सदर)

भुवनसुंदरी धन्य असशि तूं शत्रुवरी उपकार

करणें हेंच असे मोठेपण ॥धृ०॥ परि मन कठोर
करिं या वेळे ॥ उठविन अरीस आपुल्या
विमले ॥ देईल दु:खें क्षणोक्षणीं हा ॥ सत्य
सत्य तव जाण अवघे क्लेश लयाला गेले ॥ १ ॥

भु० सुं०–आई जगदंबे, त्याला या वेळीं जिवंत केलेंच पाहिजे.

देवी०–तुझी मर्जी. हें माझ्या पूजेचें तीर्थ त्याच्या अंगावर शिंपड म्हणजे तो जिवंत होईल. मीं जातें. (देवी गुप्त होते.)

(भुवनसुंदरी पूजेचें तीर्थ शिंपडून क्रूरसेनास जिवंत करते.)

क्रू०से०–(सावध होऊन) कायहो मला कितीतरी गाढ मूर्छना आली होती. असो पण एवढ्यांत हिनें माझी मान कापली नाहीं हे हिचे उपकारच समजले पाहिजेत आणि ह्यावरून हिची मजवर प्रीतिही आहे असें वाटतें. (इतक्यांत दार वाजतें) अरे कोण दार वाजवितो.

चंदु०–(आंतून) जी मी चंदु आहें सरकार.

क्रू०से०–(दार उघडून) चंद्या, कां रे आलास ?

चंदु०–महाराज, धाकटे सरकार विजयी होऊन आल्याची वर्दी देण्याकरतां आलों आहें.

क्रू०से०–काय प्रतापचंद्र आला ? (मनाशीं) आतां मात्र कठीण प्रसंग आला. (दोघे कांहीं वेळ हळु हळु बोलतात) हं असेंच केलें पाहिजे. (भुवनसुंदरीस हात जोडून) भुवनसुंदरी, मला आतां सर्वस्वीं क्षमा कर. मी तुला शरण आहें. ही गोष्ट तूं कोणाजवळ बोलूं नको.

भु०सुं०–मी कोणाजवळ बोलायची नाहीं. आपण मात्र असली दुष्ट वासना पुन्हां मनांत आणूं नका.

क्रू०से०–चल तर, तुझा पति विजयी होऊन आला आहे, त्याला आपण सर्वांनीं सामोरे जाऊं.

भु०सुं०—ठीक आहे. स्त्रीसैन्याच्या जमादाराकडून मी माझा रथ तयार करवितें.

कू०से०—चंद्या, जा. स्त्रीसैन्याच्या जमादारास भुवनसुंदरीचा रथ तयार करण्यास सांग आणि माझाही रथ तयार करीव. (भुवनसुंदरीस) भुवनसुंदरी, जा. तूंही मंदिरांतून तयार होऊन ये. (भुवनसुंदरी व चंद्या दोघे दोन बाजूनीं जातात.)

कू०से०(ती गेलीसें पाहून) ठीक आहे तुला सोडतों कीं काय ?

साकी.

साधिन आतां कार्य कसें तरि विपिनिं नेऊनि तिजला ॥
कसा टाळला आला होता, प्रसंग या समयाला ॥
पर्वा नाहिं आतां ॥ फसविन तिज हं हं म्हणतां ॥ १ ॥

अंक २ समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला. (स्थळ रस्ता.)

पात्रें.

कूरसेन—राजा. चंदु—त्याचा नोकर. स्त्रीसैन्याचा—जमादार. सत्वशील—कनकावतीचा राजा. भुवनसुंदरी—नायिका. (प्रतापचंद्राची स्त्री). भिल्ल व राजसेवक वगैरे.

चंदु–(प्रवेश करून) प्रतापचंद्र महाराज विजयी होऊन परत आले. हे शब्द कानीं पडतांच आमच्या कूरसेन महाराजांची छाती कशी गडबडून गेली होती. परंतु त्याला सामोरें

जाण्याच्या बहाण्यानें भुवनसुंदरीला महाजंगलांत घेऊन जा-ण्याची युक्ति पण कशी बिनतोड सुचली. आणि त्याप्रमाणें सर्व अनुकूलही झालें. स्त्रीसैन्याच्या जमादारानें मोहरांची थैली पाहिल्याबरोबर भुवनसुंदरीचा रथ मुकाट्यानें ठरविलेल्या जंगलाच्या रस्त्यानें चालताच केला. आतां मात्र आमचे क्रूरसेन महाराज भुवनसुंदरीपासून आपला हेतु पूर्ण करून घेतल्याशिवाय सोडणार नाहींत. काय करील बिचारी त्या भयंकर जंगलांत व्याघ्रमुखीं धेनूच सांपडली आहे. असो आतां आपण त्यांच्या संकेताप्रमाणें भुवनसुंदरी कोणाबरोबर तरी पळून गेली, अशा खोट्या बातमीचा राजवाड्यांत पुकारा करावा. म्हणजे आपण सांप्रतच्या कामगिरींतून मुक्त झालों. (जातो).

प्रवेश २ रा. (स्थळ जंगल)

स्त्री० जमादार-(रथ उभा करून) प्रतापचंद्र महाराजांनीं मी पूर्ण विश्वासु म्हणून मला स्त्रीसैन्याचा मुख्य जमादार केलें, असें असून या पैशासाठीं मी त्याचीच प्राणप्रिया जी भुवनसुंदरी तिला आज त्या निर्दय पशूच्या हातांत द्यावी ना? आतां त्या बिचारीला तो नराधम या दुर्धर वनांत अनेक प्रकारें छळून तिचे हालहाल करील. असो. आई जगदंबे, आतां तूंच तिची पाठिराखी आहेस. (जातो).

क्रूर०-(प्रवेश करून)

पद-(आनंदें नटती) ही चाल.

कानन हें नयनीं ॥ पाहुनि मी मनीं बहु सुख
मानी ॥ कानन० ॥ धृ० ॥ गगन चुंबिण्या
धांवती तरुवर ॥ दिनकर न दिसे महा भयं-
कर ॥ रतिसुख येथें सेविन निर्भर ॥ मीच
धन्य भुवनीं ॥ कानन० ॥ १ ॥

(भुवनसुंदरीच्या रथाजवळ जाऊन) जमादार, (पाहून) जमादारही आपलें काम बजावून गेलाच वाटतें.

भुवनसुं०–(रथाखालीं उतरते व भयंकर अरण्य पाहून घाबऱ्या घाबऱ्या) अगबाई ! हें काय ? जिकडे तिकडे भयंकर अरण्यच दिसत आहे. मी माझ्या विजयी होऊन आलेल्या पतीला सामोरीना आलें ? अथवा संशय नको–

पद–(धेनुमुखीं हा व्याघ्र०) चाल.

निर्दय कपटी खल हा मोठा डाव साधुनी मजला ॥
आणियलें या घोर काननीं देइल बहु तापाला ॥
घाबरला मम जिव येथें ॥ न सुचे काय करावें तें ॥१॥

क्रूर०–(तिच्याजवळ जाऊन) अहाहा ! सुंदरी—

पद–(स्वर्योषाही रसिका०) ही चाल.

रतिहुनि सुंदर दिससी नयनीं
सेवी रतिसुख प्रेमें करुनी ॥ धृ० ॥
कोणाचीही पर्वा येथें ॥
उरली नाहीं लवभर कांते ॥
दे तव आलिंगन सौख्यातें ॥
धन्य मानुनी अवघ्या भुवनीं ॥ १ ॥

भु० सुं०–(सविनय) महाराज, मला माझ्या विजयी होऊन आलेल्या पतीला सामोरें ना आणलेंत, माझे पति आहेत कुठें आणि तुम्ही प्रकार तरी काय मांडला आहांत.

क्रू० से०–भुवनसुंदरी, ह्या यःकश्चित् प्रतापचंद्राच्या हातून तुझे काय हेतु पूर्ण होणार. तुझ्या सेवेंत हा दास सदासर्वकाळ तत्पर आहे. बोल बोल, काय इच्छा आहे ती.

भु० सुं०–(त्याला हात जोडून) महाराज, "दया" हा शब्द जर तुम्हांला माहीत असेल. आणि "पतिपत्नीचें

म" तुमच्या हृदयांत वागत असेल, तर कृपा करून एक वेळ
ला माझ्या प्रिय पतीची भेट करवा. दुसरी कांहीं इच्छा नाहीं.

क्रूरसे०—

पद-(रसिकेवरती त०) ही चाल.

पट्टराणि तुज करितों सखये दे दे आलिंगन मजला ॥
प्रतापचंद्राची नच पर्वा सोडुनि दे या दुःखाला ॥धृ०॥

भु०सुं०—

भूमिपालका, मानुनी मनीं ॥ दीन कन्यका रक्षि या
जनीं ॥ भेटवीं त्वरें पतिस नेउनी ॥ कन्यकेवरी प्रेम
ठेवुनी ॥ या चरणीं मी नमुनीं ॥ विनवितसें हें आ-
पुल्याला ॥ १ ॥

क्रूर०से०—

नाहिं धीर नाहिं धीर नाहिं धीर गे ॥
स्मर मारि मार उरिं फार करि ठार ॥ नाहिं० ॥धृ०॥

भु०सुं०

लाज तुला नाहिं मूढा स्पष्ट आजि सांगतें ॥
दुष्ट वासनाहि सोड सोड सोड दुर्मते ॥

क्रूरसे०—

तुष्ट करी अजुन तरी बोल मदीय मान हें ॥
श्रेष्ठनरा कष्टविशी व्यर्थ मान मान्यते ॥
मान मान मान मान मान ॥ नाहिं धीर० ॥ १ ॥

भु०सुं०—

मान्यताहि बघुनि तुझी लाज वाटते मला ॥
वानितोस कासयास वैभवास तूं खला ॥
धवलवंश बुडविलास नर्कवासिं आपुला ॥

क्रूरसे०—

मान मान मान मान मान ॥ नाहिं धी० ॥

भु०सुं०—

पद-(चिंताही दे सो०) ही चाल.

छंदें या या लोकीं मूर्खा कितितरी नर फसले ॥ ध्रु० ॥
जनक सुतेला हरुनी दशमुख गेलारे मरुनी ॥
हंडा ऐसे बहुत खासे याच ध्यासें ॥
विलयाला गेले रे नीचा वैभव तव कसलें ॥ १ ॥

क्रूरसे०—मूर्खे, तुला अनेक प्रकारानें सांगत असतांही तूं अद्याप माझें ऐकत नाहींस, त्यापेक्षां या जगांतूनच तुला नाहींशी करून टाकतों. (असें ह्मणून तिची वेणी धरावयास जातो.

भु०सुं०—(घाबरुन सैरावैरा धांवत)

पद-(मान्य मान्य मान्य०) ही चाल.

तारि तारि तारि तारि अंबिके हि किंकरी ॥
मार मार मार मार ठार ठार हा अरी ॥ ध्रु० ॥
नाहिं त्राण मजासिं जाण पंच प्राण तव पदीं ॥
अर्पुनि मी प्रार्थितें मम प्राणपतिस भेटवीं ॥ १ ॥

असें ह्मणून जमिनीवर निश्चेष्ट पडते.

क्रूरसे०—ठीक आहे, आतां या भुवनसुंदरीचें शीर धडापासून वेगळेंच करून टाकतों ह्मणजे झालें. (तलवार काढून उगारतो, इतक्यांत देवीचा दूत एकदम प्रगट होऊन त्याची तरवार वरच्यावर धरतो.)

दूत—मी देवीच्या आज्ञेवरून या अधमाला एक वेळ ठार मारला असून या साध्वीनें त्याला पुन्हां जिवंत केलें हेंच वाईट झालें. पण बरें, सज्जनांचीं मनें किती कोमल असतात तीं आणि याच्यासारख्या नीच कर्में करणाऱ्या नराधमांस कितीही शिक्षा भोगावी लागली तरी त्यांची दुष्टबुद्धि कधींच नाहींशी व्हावयाची नाहीं.

कू० से०—(तलवारीचा हात बरच्यावर धरलेला पाहून चकितपणें) अरे, काय चमत्कार हा. माझा हात बरच्यावर जखडून धरणारा असा येथें आहे तरी कोण. मला तर माझ्या आसपास कोणीच दिसत नाहीं. (हातांतली तलवार सोडून) असो, आतां या ठिकाणीं आपण फार वेळ न राहतां लौकर निघून जावें हेंच योग्य. (भुवनसुंदरीस सावध करून) भुवनसुंदरी, तूं या रस्त्यानें मागें न येण्याचें वचन देशील तर मी तुला जीवनदान देतों. जा तुला वाटेल तिकडे.

भु सुं०—ठीक आहे, पण माझे प्राणनाथ मजविषयीं विचारतील त्या वेळीं तुह्मी त्यांना काय सांगाल.

कूर०—भुवनसुंदरी महालांतून एकाएकीं नाहिंशी झाली ह्मणून सांगेन.

भु० सुं०—

पद.—(जब्के कलंदर०) ही चाल

अनृतवाणी वदनीं वदतां होशिल मूर्खा अंध
पुरा ॥ जळो जळो तव जन्म मदांधा तूंच
पापि या जगतिं खरा ॥ धृ० ॥ तव पापाचा
या झाडा खावा लागेल तुजसि खास ॥ जगीं
छी थू होउनियां भोगशील दुःसह क्लेश ॥
सत्य सत्य प्राप्त होइल अंतीं नरकवास ॥
तव० ॥ अ० ॥ १ ॥

कू० से०—अं! अशी कावळ्याच्या शापानें गुरें मरतीं तर काय न होतें. (जातो).

भु० सुं०—आतां मला या निर्जन प्रदेशांत दुःखांतून मुक्त करणार एका जगदंबे वांचून कोण समर्थ होणार आहे.

पद–(कोई सुनो मेरी फरयाद०) ही चाल.

कशी दैवगती फिरली ॥ नच आशा मजला
लवभरही उरली ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ॥
कशी० ॥ धृ० ॥
घोरवनीं या जाउं कोठें काय करूं करणी ॥
कांतविरह तनु जाळितसे ही माझी क्रूरपणीं ॥
पती भेट होय ही आस समुळ सरली ॥ या–
का–लीं ॥ कशी ॥ १ ॥
तात जननीसह आप्तहि अवघे अंतरले जग-
तांत ॥ रक्षक पाहतां नच जगदंब देई त्वरें
मज हात ॥ मम सौख्यें अवघीं विलयाला
गेलीं ॥ हाय ! हाय ! हाय ! ॥ कशी० ॥२॥

(मूर्च्छित पडते इतक्यांत लुटारू येतात)

भिल्ल—

पद.–(पुस्कळ चोऱ्या केल्या०) ही चाल०)

कुळीवंत आह्मी भिल्ल लुटारु लुट करुनियां
भारी ॥ करुनियां ॥ पोशितों वैनिनें बायका
पोरें सारीर ॥ जी जी जी जी० ॥ धृ० ॥
राजाचाही पाड न आह्मां कसली असे ती
थोरी ॥ असे ती० ॥ शेट सावकार लुटुन
तयांच्या आणतों पळवुन नारीर ॥ जी जी०॥
भाग्यवान आह्मिं किती असे हो नाहीं आ-
ह्मांला वैरी ॥ आह्मां० ॥ निर्धास्त हिंडुनी
वनांमंदीं या करतों आह्मी चोरीर ॥जी०॥१॥

भि० पहिला०–अर राम्या, त्या करवंदीच्या झाळीमंदीं कोन
र बिट्या रडतय तें.

सोम्या०–(ऐकून) अर होतर इस्तुरीचा सबद् वाटतुया.

पिऱ्या०–अर कसली बिटया इस्तुरी या रानामंदी भूत रड-त्याती भूत, माझ्या बापानें याक भूत बगतलान व्हतं.

राम्या–चल मरदाच्या, आह्मांस्नी भूत र काय करत्याती. मी त भूत कंदींबी बगतलं न्हाय. चला बिटयानुं एकटया दुक-टयाला भूत भ्या दावोल, का समद्यांच्या मनावर याक भूत बसल. (भुवनसुंदरीजवळ जातात.)

सर्व–(भुवनसुंदरीस पाहून)

पद.–(अरे हि बग शिकार०) ही चाल.

अर हें भूत कितीतरी हाय मजेदार ॥
बघुनशानी मन होतसे गार ॥ अरेहें० ॥ धृ० ॥

पिऱ्या०—

माझे मानेवर बसुन मी घेतों ॥ मा ० ॥
तुह्मी पळा न्हांयत मराल र ठार ॥ बघु० ॥

राम्या—सोम्या:—

तरणी जान जणुं बिजलीर वानी ॥
कंदीं न पाहिली असली नार ॥ बघु० ॥

बाई, तूं कोनाची कोन हायस अनी या रानामंदी तूं कशापाय आलीयास.

भु० सुं–बाबानों, मी वाट चुकून हिकडे आलें आहे.

सोम्या–तर मग तूं आमच्या घरीं चल. आमास्नी शेती भाती व्यापार धंदा करावा लागत न्हाई. आमी राजाच्या कराला बी जुमानीत न्हाई आणि घरामंदी सोनें वानें रेट भर-लया. आमास्नीं तुह्मी सारख्या बायकाबी हायती.

राम्या–होय होय त्या समद्या पाटाच्याच बायती.

लग्नाची बायको यकबी न्हाय. तुला पन सोन्याचा दावला करून देऊं.

पिंन्या—मी मीच तुझ्याशीं पाट लावीन. (सोबत्यास) हिच समद दागिने तुमास्नीं वाटून देतों अनी अस्तुरी मात्र मी घेतों.

राम्या—सो०—लय लय बेस लय बेस. अस्तुरी तूं घे नी दागिने आमास्नी दे.

पिंन्या—(भुवनसुंदरीच्या जवळ जाऊन)

पद.—(मी पोपट तूं०) ही चाल.

भग मी धनी तूं माझी रानी ॥ भाग्यवान
मजसमान कोणी नाहीं या भुवनीं ॥
मी धनी० ॥ धृ० ॥ करूं आम्हिं सदा सखे
ग चैनी ॥ उणें तुला या जगीं न आतां येतां
मम सदनीं ॥ मी धनी० ॥ १ ॥ऐकुनी सुंदरी
ही मम वाणी ॥ जाउं चल घरीं झडकरि ये-
थुनी प्रेमें कर धरुनी ॥ मी धनी० ॥ २ ॥

(इतक्यांत चोरांचा नाईक येतो).

नाईक—(त्यानां धमकावून) अरे मूर्खानों, तुमास्नी कितीबी सांगाव तरी आपलें मूर्ख ते मूर्खच—

पद.—(धीर धरा जरा०) ही चाल.

स्त्रीलोभ जराबी न्हायर बरा ॥ स्त्रि० ॥ त्या-
रानीं धनलोभ धरावा तरीच ते या जगतीं ॥
सुखामंदीं पच खाती पीती न्हायत त्याला
जाती ॥ स्त्रि० ॥ पर स्त्रियेला निज मातेसम
मानुनियां जे न्हाती ॥ सदा सर्वदा यश त्यां-
ना येऊनी मिळते कीर्ति ॥ स्त्रि० ॥

अर फार कच्याला वा कोचे दागिने मांगा, तरी ती मुका-टयानें काढून ते तुम्हांस्नी देईल पण तिला भ्रष्ट करण्याच्या कामास जर का तुह्मी लागाल, तर दागिनेच्या दागिने जाऊन तुमची वर कायची संकट आल्या शिवाय व्हाणार न्हाई.

पिन्या—अर चल आसल बुळकट नाईक न्हाय मी पगित-ल. आपण बुळकट ते बुळकट, पण दुसऱ्यास्नी बी बुळकट करायला पगत्यात.

भु० सुं०—(नाईक) बाबा तूं चोर आहेस तरी चोरीचे कायदे जाणतोस. ह्मणूनच तूं नाईक झालास. मला त्यांच्या हातून सोडविणारा कोणी नाहीं.

नाई०—(चोरांस धमकावून) चलारे त्या बाईपासून दूर व्हा.

पिन्या—नाईकदादा या बाबतींत जर तूं बोलशील तर तुझं माझं बिल्कुल पटायचं न्हाई. (इतक्यांत घोड्याच्या टापा ऐकू येतात.)

चोर—(कानोसा देऊन) खास कोणी तरी घोडेसवार येत्याती. (झाडींत पळतात.)

(सत्वशील राजा शिकारी लोकांसह शिकार करीत प्रवेश करतो.)

सत्व०रा०—(घोंगडी पांघरलेल्या पिन्यास पाहून) अरे, तें पहा आस्वल. (बाण सोडतो तो बाण त्याला लागतांच तो ओरडून पडतो.) शिकारी लोक त्याला ओढीत राजाज-वळ आणतात.)

स०रा०—(त्याला पाहून खिन्न होऊन)

पद. (त्यजि सखे ही चिंता०) ही चा०

या शिकारि पाई मम हस्तें बहु प्रमाद हा घ-

डला ॥ निरपराधी मानव वधिला ॥ काय
करूं तरी या पापाला ॥

भु०सुं०—

पतंग झंपा दीपिं घाली परि त्या ऐशिपरी ॥
गुणवंता, प्रजत्राता, नच आतां, जगिं पहातां,
ममताता, समचिंता,हरि आतां॥करुनि दया॥

स०रा०—

न धरीं भीती त्यजीं अवघी ॥ चिंताही ॥

भु०सुं०—

तुम्हिं कृपालु जाणुनी चरणीं विनंति करितें
॥ विनं०—

भु०सुं०—(राजास सविनय) महाराज तो मला छळित होता इतक्यांत घोड्याच्या टापा ऐकून झाडाच्या आड जाऊन लपून बसला होता तरीही त्याच्या मृत्यूनें त्याला सोडलें नाहीं. दुर्जनाला मारणें पाप नसून पुण्यच आहे. तें आपण आपल्या पदरीं घेतलंत. याचे साथीदारही इथंच या झाडींत लपून राहिले आहेत. यांचा नाईक मात्र न्याई आहे. या दुष्टांच्या हातून मला सोडविण्या करितां ईश्वरानेंच आपणाला या ठिकाणीं पाठविलें.

स०रा०—(सेनापतीस) सेनापति, जा या जंगलांत ते दुष्ट लोक ज्या ठिकाणीं लपून बसले असतील तेथून त्यांना शोधून मुसक्या बांधून घेऊन या.

सेनापति०—(मुजरा करून) ठीक आहे महाराज, आज्ञेप्रमाणें व्यवस्था करितों. (जातो).

स०रा०—(भुवनसुंदरीस) बाळे, तूं कोण कशी या ठिकाणीं आलीस. याची चवकशी मी यावेळीं करीत बसत नाहीं. ज्या

पेक्षां तूं या भयंकर जंगलांत संकटांत सांपडलीस यावरून आश्रयाला पात्र आहेस.

सेनाप०–(चोरांसह प्रवेश करून) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें हे लोक भरून आणिले आहेत.

स०रा०–ठीक आहे. या सर्वांना बांधून शहरांत घेऊन चला. (भुवनसुंदरीस) बाळे !

साकी.

धर्माची मम कन्या मानुनी सांभाळिन तुज
बाळे ॥ सोडुन देईं अवघी आतां ह्या चिंता तव
विमले ॥ जाऊं चल सदनीं ॥ प्रेमानें रहा दि-
नरजनीं ॥ १ ॥

(सर्व जातात. पडदा पडतो.)

(प्रवेश २ रा समाप्त.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—महाल.

(क्रूरसेन आसनस्थ प्रवेश करतो.)

क्रू०—

पद०–(नारी नजर तुझी०) ही चाल.

राजा इंद्रतुल्य असुनी ॥ मी राजा० ॥ वैभव
माझें पाहुनी अवघे ॥ लागती नृप चरणीं ॥
मी राजा० ॥ ध्रु० ॥ भुवनसुंदरी त्यागुनी गे-
ली ॥ सुख नच मज म्हणुनी ॥ मी राजा० ॥
रतिहुनी सुंदर रूप तिचें तें खेळे मम नय-

नीं ॥ मी राजा० ॥ कांहिं सुचेना कांहिं रुचे-
ना ॥ शून्य गमे भुवनीं ॥ मी राजा०॥ १ ॥

प्र०चं०—(गडबडीनें प्रवेश करून) दादा, माझी प्रिया भुवनसुंदरी कुठें आहे.

क्रूर०—(प्रतापचंद्रा मीही विचारांत आहें. तिनें प्राणत्याग तर केला नसेल ना ? छे, छे, कोणाच्या तरी नादानें ती पळून गेली, हीच गोष्ट खरी आहे. (इतक्यांत चक्कर आल्यासारखा खुर्चीवरून खालीं पडतो.)

प्र०चं०—हं हं दादासाहेब, हें काय ? कोण आहे रे तिकडे.

चंद्या—(धांवत येऊन) जी सरकार मी आहें चंदु. काय हुकूम आहे.

प्र०चं०—जा लौकर पाणी घेऊन ये.

चंदु—होय सरकार. (जातो व पाणी घेऊन येतो.)

प्र०चं०—(डोळ्यांस पाणी लावून) दादासाहेब, उठा उठा (वर उठवितो.)

क्रू०से०—(अंधत्वआल्यामुळें कांहीं दिसत नाहीं असा वर उठून) प्रतापचंद्रा, भुवनसुंदरी हें नांव जिला यथायोग्य शोभत होतें अशी स्त्री तुला मिळालेली असून ती आज एकाएकीं नाहिंशी झाली या दुःखानें माझी अशी स्थिति झाली आहे.

(अंधासारखा जिकडे तिकडे चांचपतो.)

चंदु—(बाजूस) त्या महासाध्वीला असह्य दुःख दिलें स्मणून तिच्या शापानें हें अंधत्व प्राप्त झालें. तरीसुद्धां अजून आपला स्वभाव सोडीत नाहींस याला काय म्हणावें ?

प्र०चं०—पण दादा, बोलतांबोलतां आपण आंधळे झालां यांचें कारण काय ?

क्रूर०—दुःखातिशय.

प्र०चं०—(बाजूस) यांतच कांहीं तरी आहे. माझी सद्गुणखनी ती प्रिया एकाद्याच्या नावानें पळून जाईल, हें मनांत सुद्धां आणायला नको. असो, आतां हा काय प्रकार आहे याचा अगोदर बारीक रीतीनें शोध केला पाहिजे. (उघड) दादा, मी भुवनसुंदरीच्या शोधाची व्यवस्था लावून नंतर इकडे येतों (जातां जातां)

पद.—(यबदीमें पाया गंभ०) ही चाल.

त्या सुंदरीविण मत्प्राण ॥ होति हैराण ॥ध्रु०॥
मत्प्रिया सुखाची खाण ॥ नसे मज ज्ञाण ॥
तिच्याविण त्राण ॥ त्या सुं० ॥
॥ शेर ॥ जगत्पालक प्रभुतो मजवरी॥ इतुका
कसा कोपला ॥ जळते तनु तत्पर हे अती ॥
अंत गमे जाहला ॥ मच्च डरलें मजसी भान॥
नको सन्मान ॥ मत्प्रिया० ॥ १ ॥

(जातो.)

क्रू०से०—(सुसकारा टाकून) धन्य धन्य भुवनसुंदरी, तूं खरी महासाध्वी आहेस. मी विषयांध होऊन तुला छळीत असतां आपल्या पातिव्रत्यतेजानें मला एक वेळ ठार मारून पुन्हां उठविलेंस जगांतून तुला नाहिंशी करण्याकरितां मी तलवार वर केल्याबरोबर माझा हात वरच्यावर अचल करून सोडलास, तरीही मी डोळे न उघडतां तुझ्या प्रियपतीची आणि तुझी ताटातूट केली. त्यामुळें तूं हें मला कायमचें अंधत्व दिलेंस. धन्य आहेस तूं.

पद.—(जय त्रिपुर दमन०) ही चाल.

मम जीवित सकल ॥ जगतिं विफल ॥ जाह-
लें अतां ॥ छळिलि पतिव्रता ॥ म्हणुनि अंध-
ता ॥ भोगितसें क्षण न लागतां ॥ करूं काय

तरी राजवैभवास या पुढें ॥ फळ हें रोकडें ॥
मज प्रती घडे ॥ शून्य गमे भुवनीं राहतां
॥ मम० ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक ३ समाप्त.

अंक ४ था.

पात्रें.—राणी–दासी–देवी दोन गृहस्थ–विसाजीपंत–कुविचार प्रधान वगैरे.

प्रवेश १ ला. (स्थळ महाल.)

(दासीसह राणी महालांत बसली आहे असा पडदा उघडतो.)

प्रभावती–(दासीस)

पद.–(चंद्रकांत राजाची कन्या०) ही चाल.

ज्या सदनीं नच दीप सखे तें शून्य जसें दि-
सतें ॥ तेंवि मुलाविण दहनभूमिवत मंदिरही
होतें ॥ व्यर्थ जन्मुनी कष्टविलें मी आपुल्या
मातेतें ॥ भूभारच आह्मी झालों ऐसें वाटे चि-
त्तातें ॥ राजलक्ष्मीवैभव सारें वांयासें गमतें ॥
वदन जनाला दाखविण्याला दुःख बहुत होतें ॥ १ ॥

दासी०–बाईसाहेब, आपण उगीच असा हा त्रास करून काय होणार आहे ! ईश्वर जसें ठेवील तसें राहिलें पाहिजे.

प्र०रा०–बरें सारिके, स्वारीला शिकारीस जाऊन बरेच दिवस झाले, अद्याप कां बरें येत नाहींत.

सा०दा०–(पाहिलेंसें करून) बाईसाहेब, महाराज आले. (भुवनसुंदरीसह राजा प्रवेश करतो. भुवनसुंदरीस पाहून राणी खिन्न होते.)

स०रा०–(राणीस) प्रिये, अशी जवळ ये. तुला मी आज आनंदाची वार्ता सांगणार आहें.

प्र०रा०–तो आनंद सरकारचा असेल. मला तर तें ऐकून दुःखच होणार. मूल नशीबींच जर नाहीं तर शंभर स्त्रिया केल्यात ह्मणून होणार आहे का? मी मात्र आपल्या या करणीनें सर्व सुखाला अंतरणार.

स०रा०-विचारपूस केल्याशिवाय मनाच्याच तरंगांवर सुखदुःखें मानीत राहणें याला ह्मणावें तरी काय? तुला प्रसूतिवेदने शिवाय आपत्यसुखाचा योग सहज आला. (राणी रागानें जाऊं लागते तिला धरून) सुंदरी, ही पाहिलीस का तुझी कन्या. ही मला रानांत अभ्यागत सांपडली, अर्थात् ती आपली कन्या झाली.

भु०सुं०-माते, मी नमस्कार करतें. (पायां पडते.)

प्र०रा०–जन्मसावित्री हो. बाळे, ये बैस.

भु०सुं०–मी तुह्मांला आई ह्मटलें त्याअर्थी आई ह्मणणारा मुलगा आपल्याला वर्षाच्या आंत होईल.

प्र०रा–(भुवनसुंदरीच्या गळ्यांत हात घालून)

पद.–(दशा आह्मां कशी आ०) ही चाल.

दया आमुची तया प्रभुला ॥ नये अजुनी
अंत झाला ॥ धृ० ॥ सुशिल कन्या बघुनि
तुजला ॥ मदियहृदयीं तोष झाला ॥ थोर ॥
भोगिलें दुःख मी आजवरी ॥ नाहीं त्याला
पार ॥

स०रा०–

या पुढति तरी सुदिन दावो ॥ आह्मां दीनोद्धार ॥

राजा-राणी—

भंति नेई जगत्पाळा ॥ पदीं आपुल्या तूं आ-
ल्माला ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश २. (स्थळ रस्ता.)

भु०सुं०-(दासीसह पुजेचें सामान घेऊन प्रवेश करून) अहाहा ! किती सुस्वभावी माणसें आहेत. पोटीं संतती नसल्या कारणानें मला आपलीच कन्या मानून माझ्यावर अप्रतिम प्रेम करीत आहेत. अशा नीतीनें वागणाऱ्यांना ईश्वरानें दुःखांत ठेवावें ना? असो, मानलेल्या आईला सांगितल्याप्रमाणें तिला पुत्रप्राप्ति होण्याकरितां श्रीजगदंबेची प्रार्थना केलीच पाहिजे. (दासीस) सारिके, चल हो पुढें. मला देवळाचा रस्ता माहित नाहीं.

सा०दा०-(पुढें होऊन) बाईसाहेब, या अशा या वाटेनें (जातात.)

प्रवेश ३ रा. (स्थळ देवीचें मंदीर.)

भु०सुं०-(प्रवेश करून) सारिके, आण तें पूजासाहित्य ठेव इथं आणि माझी पूजा आटपेपर्यंत तू बाहेर जाऊन बैस जा. (सारिका पूजासाहित्य देवीच्या पुढें ठेवून बाहेर जाते.)

भु०सुं०-(देवीचें पूजन झाल्यावर पुष्पांजलि हातांत घेऊन)

पद.-(नृपा करीं धरा०) ही चाल.
आजि जगज्जननि मज या जनीं ॥ आ० ॥
तुजवांचुनियां अन्य न कोणी॥जगज्ज०॥धृ० ॥

दर्शन देई निज कन्येतें ॥ विनती ही मम मा-
नुनी ॥ आ० ॥ १ ॥ आस पुरवीं आजी संद-
य अंबिके ॥ दीन कन्यका जाणुनी ॥ आजि
जगज्ज० ॥ २ ॥

देवी—(प्रगट होऊन.)

पद—(नीचा तव वच हें नमा०) ही चाल.

इच्छा तव ग्रहकरी कथन करीं ॥ इच्छा० ॥
कथन करींगे कथन करीं ॥ इच्छा० ॥ खेद
नको मनीं मानुं कन्यके ॥ जाति मी आहें तु-
जसि जगांतरीं ॥ कथन० ॥ १ ॥ विजय स-
तीचा होउनी अंतीं ॥ लयास जातिल सकलही
वैरी ॥ कथन करींगे० ॥ २ ॥

भु०सुं०—आई जगदंबे, मला भयंकर संकटांतून मुक्त क-
रून आपल्या कन्येप्रमाणें मानिलें आहे त्याला रूपगुणांनीं
युक्त असा पुत्र झाला पाहिजे. कारण—

पद.—(भवा नदी वा जलधी०) ही चाल.

मजवरती बहु प्रीती करीत असे तो नृपती ॥
कन्येहुनी अधिक मला मानितसे निज चित्तीं
॥ धृ० ॥ संतती संपत्ती यश कीर्ती या जग-
तीं ॥ वृद्धिंगत करीं त्याची धरुनि प्रेम मजव-
रती ॥

देवी—

इच्छा तव पूर्ण करिन त्यांतिं अवधी निज सं-
ती ॥ दिनरजनीं प्रेमभरें सेवीं तूं सुखशांती ॥ १ ॥

(प्रसाद देऊन) भुवनसुंदरी, हा प्रसाद नेऊन त्या समयतांक-

डून सेवन करीव, ह्मणजे तुझे हेतु परिपूर्ण होतील. जा. (देवी गुप्त होते व पडदा पडतो.

प्रवेश ३ रा समाप्त.

प्रवेश ४ था (रस्ता)

(दोन गृहस्थ दोन बाजूनें प्रवेश करतात)

धों०पं०–(गुंडोपंतास पाहून) अहो नमस्कार हो नमस्कार गुंडोपंत नमस्कार.

गुं० पं०–नमस्कार नमस्कार. कसेंकाय धोंडोपंत, ठीक आहेना. आज फारच गडबडींत अहांत असें वाटतें.

धों पं०–अहो गडबड ह्मणून काय विचारतां. आज आमच्या सत्वशील महाराजांना पुत्रप्राप्ति झाल्यामुळें त्यांनीं आपल्या भांडारखान्याचा दरवाजा अगदीं उघडा करून सोडला आहे.

गुं० पं०–हो हो, मीही असें ऐकलें ह्मणून तिकडेच जात आहें. अहो, पण धोंडोपंत, आमच्या महाराजांना कांहीं दिवसां पूर्वी शिकारीला गेले होते तिकडे अरण्यांत कोणीएक महापतिव्रता बाई मिळाली आहे. आणि सांप्रत पुत्रप्राप्तीही तिच्याच कृपेनें झाली असें ह्मणतात, तें खरेंच का ?

धों० पं०–अहो खरेंच ह्मणून काय विचारतां. त्या बाईला आमचे महाराज प्रत्यक्ष देवीच मानून तिच्या अगदीं अर्ध्या वचनांत वागत आहेत (पाहिलेंसें करून) अहो गुंडोपंत, ते पाहिलेत का आपले कुविचार प्रधानजी इकडेच येत आहेत. तर चला लौकर आपण या मार्गानें जाऊं (जातात.)

कुवि०प्र०–(विसाजीपंतांसह प्रवेश करून) जिच्या कु-

ळाचा पत्ता नाहीं अशी उनाड स्त्री महाराजांनीं आणून ते सर्व मसलती तिच्याच घेऊन एकंदर कारभार चालवूं लागले आहेत. तेणेंकरून माझें वजन अजीबात कमी झालें. करितां अशा प्रकारें आपल्या सुखाच्या आड येणारा कांटा काढून टाकलाच पाहिजे.

वि० पं०—पण सरकार ती कोणी महासाध्वी आहे असें ह्मणतात. आमच्या महाराजांनीं तिला आणल्या पासून त्यांचा किती जयजयकार होत चालला आहे.

कु० प्र०—अहो पण त्यांचा जयजयकार पाहून मला आनंद कसा व्हावा. जे महाराज माझ्या विचाराशिवाय कधींच कोणतेंही काम करीत नव्हते, ते सांप्रत आठ आठ दिवसांत मला भेटतही नाहींत. इतकेंच नव्हे, तर आतां माझी अशी खात्री होत चालली आहे कीं, कांहीं दिवसांनीं आह्मांला स्वस्थ घरांतच बसावें लागेल.

वि० पं०—हें आपण कशावरून ह्मणतां.

कु० प्र०—कशावरून ह्मणून काय विचारता मागचें प्रकरण ठाऊक आहेना. ह्या पाटलानें पाटीलकीचा हक्क आपणाला मिळावा ह्मणून मला दोनशें रुपये दिले होते ते सुद्धां तिनें महाराजांपुढें उघडकीस आणले.

वि० पं०—अहो पण तिला हें कसें समजलें.

कु० प्र०—ज्या दिवशीं मी दोनशें रुपये घेऊन त्या खऱ्या पाटलाचा हक्क दुसऱ्याला दिला, त्यावेळीं तो कुठें रस्त्यानें बोलत जात होता कीं, "अन्याय अन्याय" ह्मणून तें या उनाड बाईनें ऐकिलें आणि त्याला वाड्यांत बलावून तपास केला. पुढें ज्याला मी लांच घेऊन पाटील केला होता, त्यालाही आणून धमकी दिल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं, प्रधानजींनीं

दोनशें रुपये घेऊन माझ्यासारखा न्याय केला ह्मणून. अहो, हेंच काय, अशा प्रकारच्या माझ्या बऱ्याच गोष्टी; तिनें महाराजांच्या दृष्टीपुढें आणून दिल्या आहेत, हरकत नाहीं, मी नांवाचा कुविचार आहें. सूड घेईन, सोडणार नाहीं. (स्मरल्यासारखें करून) हो ! असेंच केलें पाहिजे. (विसाजीपंतांस) विसाजीपंत, तुह्मी चला आपल्या कामाला.

वि० पं०—ठीक आहे, येतों तर (जातो)

कु० प्र०—(गेलासा पाहून) मादक पदार्थांचे उत्तम मसालेदार लाडु बनवून ते रात्रौ बाईसाहेबांना उपहाराकरितां ह्मणून घेऊन जातों, आणि गोड गोड गोष्टी करून त्यांच्याकडून ते खाववितों. (आठविल्यासारखें) हो, त्यांत कांहीं चांगलेही करून घेतले पाहिजेत, कारण ती एकट्यानेंच खाणार नाहीं मलाही आग्रह करील. ठीक आहे, जावेंच आतां या तयारीला

(जातो).

(भुवनसुंदरी दासीसह महालांत बसली आहे असा-
पडदा उघडतो).

भु०सुं०—

पद-(जोड हात नाक घांस) ही चाल.

कांतविरह भार फार सोसवे न मज जरा ॥
मार मार मारुनियां ठार करितसे पुरा ॥ धृ० ॥
दासदासि सकल अशनी विकल मजसी भासतें ॥ काय करूं धीर नसे दैवयोग हा खरा
॥ कांत० ॥ १ ॥ दोन कन्यकाहि अतां तारि तारि अंबिके ॥ वारि क्लेश प्राणनाथ भेटई करुनि त्वरा ॥ का० ॥ २ ॥

सा०दा०—बाईसाहेब, ज्या ईश्वरानें सर्व भुवनाचें सार ओतून आपली ही सुंदर मूर्ती बनविली आहे, त्याला तुमच्या सुखदुःखाची कांहींच का काळजी नसेल? अहो, ज्यांच्या तेजावर सर्व जगाचा व्यापार चालतो असे जे चंद्रसूर्य त्यांना सुद्धां ग्रहपीडेनें कांहीं वेळ काळिमा येते. मग आपण तर मनुष्यच आहोंत. धीर सोडूं नका. आज ना उद्यां सर्व हेतु परिपूर्ण होतील.

भु०सुं०—बाई सारिके, भोक्तृत्व तेवढें भोगल्या शिवाय गत्यंतर नाहीं, हें मोही जाणतें, पण काय करूं. दुःखाचे उमाळे आवरत नाहीं. बरं पण विश्वसेनाला अद्याप आईनें दूध पाजून कसें इकडे पाठविलें नाहीं.

सा०दा०—बाईसाहेब, मी जाऊन त्यांना घेऊन येतें. (जाते व राणीसह मुलाला हातावर खेळवीत आणून भुवनसुंदरीजवळ देते.)

प्र०रा०—(भुवनसुंदरीजवळ जाऊन) बाळे, दूध पाजून झाल्यावर या विश्वसेनाला क्षणभरतरी मी माझ्या जवळ ठेवतें का ?—

पद.—(हा नृप ईश्वर विजइ०) ही चाल.

तत्कृपेचा लाभ भला ॥ प्राप्त जाहला आह्मांला ॥
धृ० ॥ पुत्रसौख्य पाहुनी नयनीं ॥ मोद होतसे किती ह्मणुनी ॥ धन्य गमे जगतांत तव लीला ॥
तत्कृ० ॥ १ ॥

स०रा०—(प्रवेश करून)

वरील अंत्रा—

पुत्रासह या राज्याची ॥ तूंच स्वामिणी आहि साची ॥
अलभ्य सुख ठेवा तुवां दिधला ॥

प्र०रा०—

तत्कृपेचा लाभ भला ॥ प्रा० ॥ २ ॥

भु० सुं०—बाबा, मी अनाथ अबला. माझ्या हातून काय होणार आहे. त्या जगदंबेनें तुमचे हेतु परिपूर्ण केले.

स०रा०—अहाहा ! बाळे—

पद.—(कोणी नेला गेला०) ही चाल.

आशाअंकुर आमुचा बाळे समूळ सुकुनी ॥ गेला होता परि त्या पाणी सुरम्य घालुनी ॥ धृ० ॥ टव-टवीत तू केलं असशी वर्णु किती तव लीला ॥ सती तुझ्यासम अन्य नसेगे प्रभाव निज दाविला ॥ झालों धन्य धन्य आजी खचित भुवनीं ॥ अम्हां ऐसा भाग्यशाली अन्य न कोणी ॥ १ ॥

भुवनसुं०—तुह्मी आपलें कांहीं तरी ह्मणा. (मुलाला हातावर खेळवून व चुंबन घेऊन) बाळा, झोंप का आली तुला. (सारिकेस) सारिके, जा. याला नेऊन मंचकावर झोंपिव

(तिच्याजवळ देते व ती नेऊन मंचकावर झोंपविते.)

स०रा०—बरं तर, आह्मीही येतों आतां.

राणी०—जेवणाची तयारी झाल्याबरोबर तुलाही बलावूं पाठवितें.

(राजा व राणी जातात.)

इतक्यांत कुविचार प्रधान हातांत लाडवांचें ताट घेऊन प्रवेश करतो.)

कु०प्र०—(ताट भुवनसुंदरीच्या पुढें ठेवून) बाईसाहेब, मी आज आपल्याला उपहाराकरितां कांही फराळाचें सामान आणलें आहे, तें ग्रहण केलेंच पाहिजे. (ताट उघडतो.)

भु०सुं०—ठीक आहे. प्रधानजी, तुह्मीं इतक्या प्रेमानें जें

कांहीं आणलें आहे. तें मोठ्या आनंदानें मी ग्रहण करीन. (चतुरिकेस) चतुरिके, आईला जाऊन सांग कीं, आज मी तिकडे भोजनाकरितां येणार नाहीं. इथंच कांहीं उपहार करणार आहें. (ती जाते.)

कु०प्र०–(दासी गेलीसें पाहून.) ठीक आहे, अशीच संधी मला पाहिजे होती. (भुवनसुंदरीस) हं बाईसाहेब, आटपा तर आतां उशीर कां ?

भु०सुं०–हो, तुम्हीही बसा. (ताटांतील चांगले लाडू बाजूस करून मादक पदार्थाचे तिच्या पुढें करतो.) हं बसा बाईसाहेब.

भु०सुं०–(बसते व लाडू खाऊं लागून) वा प्रधानजी, लाडू तर फारच रुचिकर बनविलेले आहेत.

कु०प्र०–ह्मणजे, आपल्यासारख्यांना ते तसेच असले पाहिजेत. (बाजूस) आतां थोडक्याच वेळांत तुला चांगली रुची समजून येईल. सर्व राज्याची स्वामिणी बनून गेली होतीस. हरकत नाहीं, दाखवितों आतां तुला प्रधानकीची अक्कल. (भुवनसुंदरी खातां खातां गुंगून बेशुद्ध पडते.) हो, झालें आतां माझें काम. (कंबरेंतील कट्यार काढून) आतां पहिल्यानें ज्याच्याकरितां हिचें प्राबल्य वाढलं आहे त्या पोराचें या कट्यारीनें पोट फोडतों, आणि काळीज काढून हिच्या तोंडांत देतों व आंतडीं गळ्यांत घालतों, ह्मणजे हं हं ह्मणतां आपला हेतु शेवटास जाईल. (मंचकावर निजलेल्या मुलाचें कट्यारीनें पोट विदारण करून काळीज काढून भुवनसुंदरीच्या तोंडांत देतो व आंतडीं गळ्यांत घालून) हं कुविचारराव, चला आतां दरवाजे बंद करून लौकर कसे. (जातो.)

प्रवेश ४ था समाप्त.

प्रवेश ५ वा. स्थळ–रस्ता.

(सत्वशील राजा कुविचार प्रधानासह प्रवेश करतो.)

कु०प्र०–महाराज, दासीनें सांगितलेल्या प्रकारावरून हें मानवी कृत्य नव्हे. कांहींतरी पिशाच्च प्रकारच असला पाहिजे. बहुतकरून ती पोरं खाणारी लांव आहे, अजून पर्यंत ती मायावी कृती दाखवीत होती. आतां मात्र प्रसिद्धपणानें सर्व शहरांतील पोरें संपविल्याशिवाय राहणार नाहीं.

स०रा०–मग आतां याला उपाय काय ?

कु०प्र०–उपाय आहे. एखाद्या चांगल्याशा पंचाक्षऱ्याच्या साह्यानें तिला कोणत्या तरी जंगलांत नेऊन गाडून टाकली पाहिजे.

स०रा०–असा पंचाक्षरी कुठें मिळणार ?

कु०प्र०–तुह्मांला त्याची काळजी. आपल्या शहरांत एक उत्तम पंचाक्षरी आहे. आपण सांगाल तर आजच्या आजच त्याच्याकडून ही व्यवस्था करवितों.

स०रा०–ठीक आहे. चला तर तुह्मीं. याच कामाला प्रथम लागा. पण संभाळून हो. हा प्रकार समजल्यापासून माझ्या तर छातींत कशी धडकीच भरल्यासारखी झाली आहे.

कु०प्र०–अं त्यांत काय आहे. (जातो)

स०रा०–(सुस्कारा टाकून) हाय. हाय.

पद–जगत्पालक प्रभुतों मज० ही चाल,

अवचित हा महाभयंकर असा घाला कसा पातला ॥ झाला अंत अतां खचित गमतें जग शून्यसें हें मला ॥ नव्हतें तें उदरीं अपत्य त्याहुनी हा शोक बहु वाढला ॥ सौख्याचा लवलेश भुवनीं नाहीं मला राहिला ॥ चाल ॥ दैवगतीची विचित्र लीला

नकळे हो मनुजाला ॥ नकळे हो० ॥ कधीं ही
नकळे हो० ॥ दैव० ॥ स्वप्नासम त्या पुत्रसुखाला ॥
दाखविलें जगपाला ॥ वायां ॥ दाख० ॥ दैव० ॥ १ ॥

(इतक्यांत सारिका दासी हातांत चावी घेऊन येते)

सा०दा०–(प्रवेश करून राजास) महाराज, आपल्या-आज्ञे प्रमाणें धाकट्या बाईसाहेबांना अरण्यांत नेण्याकरितां प्रधानजी बुरख्याच्या गाडींत घालीत होते. त्यावेळीं एकादा मनुष्य निद्रेनें बेशुद्ध झालेला शुद्धीवर येऊन बोलूं लागतो, तद्वत् त्या मला विचारूं लागल्या.

स०रा०–काय काय विचारलें.

सा०दा०–त्या ह्मणाल्या, सारिके, हा प्रकार तरी काय आहे.

स०रा०–मग तूं काय सांगितलेंस.

सा०दा०–आपण लांव अहांत, ह्मणून महाराजांच्या आज्ञेनें प्रधानजी तुह्मांला या गाडींत घालून अरण्यांत नेत आहेत.

स०रा०–मग ती काय ह्मणाली.

सा०दा०–त्या ह्मणाल्या, मला लांव ठरवून अरण्यांत नेत आहे, त्याचं मुळींच दुःख वाटत नाहीं. परंतु या मुलाची ही केलेली दशा पाहून पोटांत कशी आग उसळूं लागली आहे. हाय ! हाय ! काय करूं. असो, पण सारिके, माझें तुला हात जोडून इतकेंच सांगणं आहे कीं, या मुलाचीं आंतडीं व काळीज जागच्या जागीं पोटांत भरून एका पेटींत मिठांत याला नीट व्यवस्थेशीर ठेव, आणि त्या पेटीचा कांहीं दिवस प्राणाच्याही पलीकडे सांभाळ कर. आज या पेक्षां ज्यास्त तुला कांहींच सांगत नाहीं. असें विनंतिपूर्वक मला सांगितल्यावरून मी त्यांच्या सांगण्याप्रमाणें व्यवस्था केली व ती पेटी त्यांच्याच महालांतील एका खोलींत ठेवून त्या खोलीला कुलूप मारून

बंद केली आहे. आणि तिची ही चावी आपणास देऊन झालेली हकीगतही कळवावी, म्हणून मी इकडे आलें.(चा.दे.ला.

स०रा०—असूं दे ती तुझ्याजवळच. अहाहा ! हा काय प्रकार असावा बरें—

पद—(अंगिकार करुनि०) ही चाल.

चमत्कार हा खचीत मजसि वाटतो ॥
गुण तिचे आठवतां प्राण दाटतो ॥ धृ० ॥
सुगुणखनी हीच जनीं भासली मला ॥
ज्ञानबुद्धि नीतिन्याय बहुत कथियला ॥
निज प्रभाव दावुनि मज तोषही दिला ॥
परि अंतीं सकल स्वप्नभास भासतो ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक ४ समाप्त.

अंक ५ रा.

प्रवेश १ ला. (स्थळ जंगल.)

(भुवनसुंदरीसह कुविचार प्रधान प्रवेश करतो.

कु०प्र०—(भुवनसुंदरीस पुढें लोटून) भोग आतां आपल्या कर्माचीं फळें.माझीं अनेक गुप्त कारस्थानें उघडकीस आणून मला महाराजांजवळचर्से काय,पण सर्व शहरांत मान नाहींसा केला होतास म्हणून ही तुला आज अशी दशा प्राप्त झाली. (असें म्हणून तिला मारण्याकरितां तलवार उगारतो तें पाहून ती निश्चेष्ट पडते. इतक्यांत देवीचा दूत गुप्तरूपी प्रगट होऊन त्याची तलवार वरचेवर धरतो.)

कु० प्र०–(हात अडखळलेला पाहून आश्चर्यानें) अरे, हा काय चमत्कार. माझी तलवार वरच्यावर अडखून धरणारा असा या ठिकाणीं आहे तरी कोण. मला तर कोणीच दिसत नाहीं. (तलवार सोडून) कोणी असो. आतां येथें जास्त वेळ राहणें बरें नाहीं. (भुवनसुंदरीस सावध करून) अहो बाई, तुह्मांला मी जीवदान देतों. पण पुन्हां या रस्त्यानें मागें येऊं नका, पुढें वाटेल तिकडे चला. मी येतों आतां.

भु० सुं०–ठीक आहे. पण माझ्या बाबाला जाऊन काय सांगाल.

कु० प्र०–त्या लांवेला अरण्यांत नेऊन गाडून टाकली असें सांगेन.

भु० सुं०–असें सांगितल्याबरोबर तूं पंगु होशील.

कु० प्र०–अं असल्या पोकळ शापाला भिवून मी तुला माझ्या सर्व सुखावर पाणी ओतून घेण्याकरितां परत नेईन, असें समजतेस कीं काय ? अग तुझा पुन्हां शहरांत कधींच प्रवेश होऊं नये असा कडेकोट बंदोबस्त करून टाकतों. तूं काय समजली आहेस. (जातो.)

भु० सुं०–(अतिदुःखानें) हाय ! हाय !

पद.–(कमलनयन कमलवदन०) ही चाल.

सकल जनन विफल ह्मणुनी विकल होय हा काय ॥
न सुचे कांहिं उपाय ॥ हाय ॥ न रुचे जीवन हाय॥
हाय ॥ विकल होय हा काय ॥ हाय ॥ हाय ॥हाय॥
॥ सकल०॥ जगज्जननि मजनिज पद दावीं ॥ देई आ-
जी हात ॥ नको नको तें राहणें आतां ॥ सत्य गमें
जगतांत ॥ दाखवि विभक्त पाय॥ हाय ॥ मज न

अन्य उपाय ॥ हाय ॥ विकल होय हा हाय काय ॥
सकल० ॥ १ ॥

(मूर्छित पडते.)

दे० दू०—(भुवनसुंदरीस पडतां पडतां सांवरून) हं हं, भुवनसुंदरी भिऊं नको. (सांवरून उभी करतो.)

भु० सुं०—(त्याच्याकडे पाहून भयचकित) बाबा, तूं आहेस तरी कोण. आई जगदंबे, अजून किती अंत पाहतेस.

दूत—भुवनसुंदरी, त्याच तुझ्या अंबिकेचा मी कराल नामा गुप्त संचारी दूत आहें. आणि तिच्याच आज्ञेवरून तुला मी वेळोवेळ संकटांतून मुक्त करीत असतों. आज तिनें मला असें सांगितलें आहे कीं, हें अमृत नेऊन भुवनसुंदरीच्या करांगुलींत भरून ठेव, ह्मणजे बारा वर्षांचेंही मेलेलें मनुष्य, ही तूं आपली करांगुळी त्याच्या मुखांत घातल्याबरोबर तें जिवंत होईल. त्याच प्रमाणें हा पोषाख तुला वेषांतर करण्याकरितां दिला आहे. हा घे, आणि वेषांतर करून माझ्याबरोबर चल. तुला जो मी रस्ता दाखवितों, त्या रस्त्यानें जा. ह्मणजे सर्व दुःखांतून मुक्त होऊन पतीसह पूर्वाहून द्विगुणित सौख्य भोगशील.

भु०सुं०—अहाहा ! आई जगदंबे—

पद.—(सांगुं मी किती कठोर नृपती०) ही चाल.

धन्य धन्य जननी तव लीला ॥ धन्य धन्य० ॥ धृ० ॥
दीनदयाघन सदय अंबिके ॥ वानुं किती मी शेषहि थकला ॥धन्य० ॥ अन्य मला नच कोणी जगांतरीं॥ अरि हतबल करीं तारीं सतीला ॥ धन्य० ॥ अंत न पाहतां लावीं सुपंथा ॥ हीच विनंती त्वत्पदकमला ॥ धन्य० ॥ १ ॥

(जातात)

प्रवेश दुसरा—स्थळ रस्ता.

भु०सुं०—(वैराग्याच्या वेषानें भुवनसुंदरी प्रवेश करते.)

पद.—(अहा उदरीं कसा माझ्या०) ही चाल.

सीतारामा मला प्रेमा त्वदिय नामीं सदा देई ॥
हृदयिं ठसावी नुरवि भ्रम भी हीच विनती तुझ्या
पाई ॥ धृ० ॥ ज्ञानबुद्धि मला नाहीं ॥ परी
प्रेमें विनति करितें ॥ बलवंता दया करुनी ॥
प्रभो अंतीं पदीं नेई ॥ १ ॥

दूतानें दाखविलेल्या रस्त्यानें या कनकावती शहरांत तर येऊन पोंचलों. पण आतां जावें कोठें आणि करावें काय, याचीच पंचाईत पडली आहे. असो.

चंद्रकेतु—(पडद्यांत)

पद.—(कांते फार तुला मज०) ही चाल.

दैवा आजचि हें माझें दैव कसें फिरलें ॥
हाय हाय मी काय करुं तरी दुःसह संकट
मजवरी आलें ॥ धृ० ॥ सर्पानें त्या घातचि
केला ॥ मांत्रिकविद्या गेलि लयाला ॥
शून्य गमे जग अवघें मजला ॥ दुःखानलिं
तनु पोळे ॥ दैव० ॥

(गावांतील कांहीं लोक दुःख करीत प्रवेश करतात.)

येसाजी०—फार वाईट ! फार वाईट ! तानाजीराव फार वाईट झालें हो.

भु—सुं०—(त्यांना पाहून) अरे बाबानों, आज या शहरांत जिकडे तिकडे दुःखोद्गार निघत असून वाद्यगजरही चालला आहे, याचें कारण काय ?

ताना०—महाराज, या नगरच्या चंद्रकेतु राजाला एकच मुलगा होता, तो आज सर्पदंशानें मरण पावला, ह्मणून जिकडे तिकडे लोक दुःख करीत आहेत आणि त्याची स्त्री सती जात आहे ह्मणून वाद्यगजर होत आहे.

भु०सुं०—धन्य धन्य ती साध्वी. असल्या पतिव्रतेला दुःखांतून मुक्त केलीच पाहिजे. (उघड) बाबानों, त्या राजपुत्राचें प्रेत स्मशानांत नेऊन दहन केलें काय ?

येसा०—अद्याप नाहीं, पण नेण्याच्या तयारींत आहेत.

भु०सुं—त्या राजाला जाऊन असें सांगा कीं, कोणीएक तीर्थवासी साधु तुमच्या मुलाला पाहण्याकरितां येत आहे. तर तो येईपर्यंत त्या मुलाचें प्रेत घरांतून बाहेर काढूं नका. जा जा लौकर.

येसा०—कांहो तानाजीराव, या साधूचें तेज कांहीं निराळेंच आहे. त्या राजपुत्राला जिवंत करण्याचा डौल दिसतो.

ताना०—हो हो, मलाही तसेंच वाटतें. चला चला लौकर. तसें झालें तर आपणालाही कांहीं बक्षिस मिळेल. (जातात.)

प्रवेश दुसरा समाप्त.

प्रवेश ३ रा (स्थळ चंद्रकेतुराजाचा महाल.)

(राजपुत्राच्या प्रेताजवळ परिवारासह राजा चंद्रकेतु महालांत बसला आहे असा पडदा उघडतो.)

चं०रा०—(इच्छा आजचि हें माझें० हें पूर्वोक्त पद ह्म०)

ताना०—(गडबडीनें प्रवेश करून) महाराज, आपल्या शहरांत कोणी एक साधु आले आहेत व राजपुत्राचें प्रेत मी येईपर्यंत महालाच्या बाहेर काढूं नका ह्मणून सांगा, असें ह्मणाले. ह्मणून मी आपणास सांगण्याकरितां धांवत इकडे आलों आहे. (पाहून) ते पहा आलेच.

भु० सुं०-(सीतारामा मला प्रेमा०) हें पूर्वोक्त पद म्ह-णत येते.

(राजादि सर्व तिला वंदन करतात. ती सर्वांस आशिरवाद देते.)

भु०सुं०-(राजपुत्राच्या प्रेताकडे पाहून) राजा, हेंच का तुझ्या पुत्राचें प्रेत.

चं०रा०-होय महाराज. (भुवनसुंदरी त्याच्याजवळ जाते व अंगावरून हात फिरवून अमृतभरित करांगुली त्याच्या तोंडांत घालतांच तो झोंपेंतून जागृत झाल्यासारखा उठून बसतो तें पाहून)

पद.-(रतिविलास गंगे माझा०) ही चाल.

जगिं धन्य धन्य मी झालों ॥ पाहुनी तुम्हांला धालों॥
त्या जननी उदरीं आलों ॥ परि आजि पावन झालों॥
दर्शनामृतातें ल्यालों ॥ पदकमलीं रमुनी गेलों ॥

भु०सुं०—(राजपुत्रास हातांत देऊन)
तो जगदोद्धार भूपाला ॥ देईल सौख्यपरे तुजला ॥
दृढ धरुनी मनिं प्रेमाला ॥ स्मर निशिदिनिं तत्पद कमला ॥

चं०रा०—(पुत्रास पुढें करून)
या पुत्रासह राज्याला ॥ वाहुनियां आज तुम्हांला ॥
मी जातों हो विपिनाला ॥ प्रार्थितों तया जगपाला॥
॥ १ ॥ जगिं धन्य० ॥

भु०सुं०-राजा, अरे आमच्यासारख्या योग्यांना पुत्र आणि राज्य घेऊन काय करायाचें आहे. आतां तुला पुत्राच्या मस्तकीं राज्यभार संपवून ईश्वरप्रार्थनेसच जर जावयाचें असेल तर खुशाल जा. तथापि प्रथम एक सांडणीस्वार क्रूर-

सेन राजाच्या हिमावतीस व दुसरा सत्वशीलांच्या इरावतीस असे दोन स्वार पाठवून तेथील राजांस अशी बातमी प्रसिद्ध करीव कीं, आमच्या शहरांत एक साधु आला आहे. तो जन्मांधासही उत्तम डोळे आणितो, मेलेलें मनुष्य बारा वर्षांनेंही जिवंत करितो व पंगूचाही पंगुपणा घालवितो.

चं०रा०—(हात जोडून) जशी आपली आज्ञा. (प्रधानास) अहो सुमित्र, चला लौकर. महाराजांच्या आज्ञेप्रमाणें या मजकुराचे दोन लाखोटे तयार करून आतांचे आतां सांडणीस्वार रवाना करा.

सु०प्र०—ठीक आहे. (जातो.)

(चंद्रकेतु राजा बातमी आणणाऱ्या तानाजीस गळ्यांतील कंठा बक्षिस देतो.)

वारांगना०—(प्रवेश करून गाऊं व नाचूं लागतात.)

पद.—(हा नृप ईश्वर विजइ०) ही चाल.

सुदिन आज हा किति गमला ॥ मोद जाहला सकलां
ला॥ विमल सौख्य या नृपनाथा ॥ प्रेमें देई भगवंता ॥
विजयि सदा जगतांत करिं विमला ॥ सुदिन आज० ॥

प्रवेश तिसरा समाप्त.

प्रवेश ४ था (रस्ता)

(सांडणी स्वार हातांत दोन लाखोटे घेऊन प्रवेश करतो.)

सांड०स्वा०—सरकारच्या आज्ञे प्रमाणें, इरावतीच्या सत्वशील राजाला एक लाखोटा देऊन या हिमावती शहरांत तर येऊन पोंचलोंच. आतां राजवाड्यांत जाऊन हा एक राहिलेला लाखोटा क्रूरसेन महाराजांच्या दरबारांत देऊन सांप्रतच्या कामगिरींतून मुक्त व्हावें ह्मणजे झालें. (पाहून) हो, हाच तो

राजवाडा, चला, असें इकडून गेलें पाहिजे. (जातो.) (प्रताप‍चंद्र एकटाच महालांत विचारांत बसला आहे असा पडदा उघडतो.)

प्र०चं०—

पद.(दिल अबान दुलन कर०) ही चाल.

प्रिय सखीवीण मजला ॥ मजला ॥ आला ॥ वीट बहु
चित्तीं या जगतीं॥नच सुगती ती म्हणुनी॥प्रि०॥धृ० ॥
विरहानल बहु जाळितसे ॥ काय करूं धीर नसे ॥
मज किमपी ॥ लवभरही ॥ ईशा ॥ दावीं त्वरें ॥
मजशी ती ॥ चारुशीला ॥ प्रिय० ॥ १ ॥

(इतक्यांत मानाजी येतो.)

माना०—(मुजरा करून) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, एक सांडणीस्वार हातांत लाखोटा घेऊन आला आहे. आज्ञा असेल तर आंत सोडतों.

प्र०चं०—कोण सांडणीस्वार ? जा त्याला आंत घेऊन ये. (तो जातो व सांडणीस्वारासह येतो.)

सांड०स्वा०—(मुजरा करून) महाराजांचा जयजयकार असो. महाराज, हा लाखोटा कनकावतीच्या चंद्रकेतु राजानें आपणास देण्याकरितां दिला आहे. (देतो.)

प्र०चं०—(तो घेऊन फोडतो व वाचून) मानाजी.

माना०—आज्ञा सरकार, काय हुकूम आहे.

प्र०चं—जा आतांचे आतां दादासाहेबांस घेऊन ये.

माना०—आज्ञा सरकार. (जातो.)

प्र०चं०—(स्वारास) तुम्ही चला आतां.

स्वार—ठीक आहे. (जातो.)

(इतक्यांत मानाजी अंध झालेल्या क्रूरसेनाची काठी हातांत धरून त्याला आणून प्रतापचंद्राचे शेजारीं बसवितो.)

प्र०चं०–दादासाहेब, कनकावतीच्या चंद्रकेतु राजाकडून एक पत्र आलें आहे.

क्रू०से०–तें काय ह्मणून ? वाच पाहूं तो काय ह्मणतो तें.

प्र०चं०–(वाचूं लागतो) श्रीमत्सकलगुणैश्वर्यमंडित राजाधिराज क्रूरसेन महाराज यांसी वि०वि० लि०का०कीं,आमच्या शहरांत कोणी एक महासमर्थ वैराग्यशाली साधु आले आहेत. त्यांची तारिफ करणें अशक्य होय. कारण जन्मांध जरी मनुष्य असला,तरी त्यांच्या प्रसादानें उत्तम दृष्टि पावतो. मेलेल्या मनुष्याचें प्रेत जर बारावर्षेंपर्यंत मिठांत ठेवलेलें असलें तर तेंही जिवंत होतें. पंगूचें पंगुत्व जाऊन तोही बरा होतो. इतकेंच नव्हे,तर त्यांच्या प्रतापाचे अनेक प्रकार आह्मीं प्रत्यक्ष अवलोकन करून आपणास लिहिलें आहे. कळावें.

क्रूर०–अहा ! प्रतापचंद्रा—

पद.–(निजरूप हिला मी०) ही चाल.

मज नयन पूर्ववत् देइल काय मज नयन० ॥ धृ० ॥
ऐकुनियां हें वृत्त मन्मनीं मोद अनावर खचितचि होउनो ॥ वाटतसे कीं जाउनियां झणीं ॥ दृढ धरावे त्याचे पाय ॥ मज नयन० ॥

प्र०चं०–भक्तजनास्तव तो जगदोद्धर ॥ अवतरुनियां
विचरे महिवर ॥ अगम्य लीला त्याचि खरोखर ॥
नलगे आतां अन्य उपाय ॥

क्रू० से०–मज नयन पूर्ववत् देईल काय ॥ १ ॥

प्रतापचंद्रा, तर मग आतां उशीर नको. लौकर तिकडे जाण्याची तयारी कर.

प्र०चं०—मानाजी, जा लौकर प्रधानाला घेऊन ये.

माना०—आज्ञा सरकार. (जातो व प्रधानासह येतो.)

प्रधा०—(मुजरा करून) महाराज, काय आज्ञा आहे.

प्र०चं०—प्रधानजी, आतांचे आतां कनकावतीस जावयाचें आहे. करितां निवडक अशा दोनशें स्वारांसह जाण्याची सर्व तयारी करा.

प्रधा०—ठीक आहे. आपल्या हुकुमा प्रमाणें सर्व तयारी करतों. (जातो.)

प्र०चं०—

पद.—(तुह्मांविण कंठुं कशी०) ही चाल.

प्रियेविण शून्य गमे जगतांत ह्मणुनि त्या य-
तिशीं प्रार्थोनी ॥ मन्मनरमणी सुगुणखणी
अशी न मिळे जगतीं अन्य ॥ प्राप्त करुनि
मी घेइन आतां होइन बहुतचि धन्य ॥
॥ प्रिये० ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था समाप्त.

प्रवेश ५ वा स्थळ—(रस्ता)

ताना०—(आनंदानें)

पद.—(कितितरी तऱ्हेचीं वेंचिलीं फुलें) ही चाल.

कसे खरे हिरे चमकति अपार ॥ कसे० ॥
आतां विकुन हा हार ॥ मिळवुन पैसे अपार॥
खासा बनेन सरदार ॥ दासदासि ठेवुनि फार॥
कसे० ॥ मग सारे माझी ॥ करतिल हांजी ॥
माझेसारखा गाजी ॥ न आजि जगामाजी ॥
नाहीं कसली दरकार ॥ कसे० ॥ १ ॥

येसा० -(प्रवेश करून) रामराम तानाजीराव, रामराम आज तर तुह्मी राव आनंदाच्या शिखरावरच नाचत अहांत.

ताना०—कां नाहीं नाचणार. तुह्मांला सुद्धां मी सांगत नव्हतों कीं, हा साधु त्या राजपुत्रास जिवंत करील. पण तुह्मी राव कसले ऐकतां मी धांवत राजवाड्यांत जाऊन महाराजांना बातमी कळविली, ह्मणून हा हार बक्षीस मिळाला ना ?

येसा०—बरें, पण तो साधु येथेंच आहे का ?

ताना०—हो तर आज मोठा दरबार भरणार आहे.

येसा०—तो कशाकरितां ?

ताना०—अहो, तो बुवा दररोज अनेक प्रकारच्या रोग्यांना बरें करीत आहे. परंतु क्रूरसेन या नांवाचा आंधळा राजा झालेला आहे तो आणि पंगु झालेला प्रधान व पेटींत मीठ भरून त्यांत मेलेल्या मुलाचें प्रेत घेऊन सत्वशील, असे दोन राजे आपल्या परिवारासह आले आहेत. तरी त्यांची व्यवस्था सर्वांसमक्ष होणार आहे.

येसा०—तर मग ही गंमत पाहण्याला दरबारांत पुष्कळ लोक जमतील नाहीं बरें ?

ताना०—हें काय विचारावयास पाहिजे. एकंदर मांडलिक राजे, सरदार मानमानकरी, शेटसावकार आदिकरून एकच गर्दी उडेल.

येसा०—तर मग ही गंमत पाहण्याला मिळेल कीं नाहीं ?

ताना०—हो हो, कां नाहीं मिळणार. सर्वांना मोकळिक आहे. चला लवकर, वेळ झाली. (जातात.)

प्रवेश पांचवा समाप्त.

प्रवेश ६ वा—स्थळ दरबार.

(राजपुत्र सिंहासनावर बसला आहे व सर्व लोक आसनस्थ बसले आहेत आणि भुवनसुंदरी यतिवेषानें सत्वशील

राजाच्या मुलाच्या शेजारीं उभी आहे.)

भु०सुं०–(मुलाला जीवंत करून) प्रधानजी, सत्वशील राजाला त्याचे प्रधानासह येथें आणा.

प्रधा०–ठीक आहे. (सत्वशीलासह पंगु प्रधानास आणतो.)

भु०सुं०–(कुविचार प्रधानास) कसें काय प्रधानजी? आपल्याला ही स्थिति प्राप्त होण्यास कारण काय बरें? एकही शब्द जर खोटें बोलाल तर अर्धें अंग बरें होईल आणि अर्धें अंग तसेंच राहील.

कु०प्र०–(स्वगत) हें असह्य दु:ख सहन करण्या पेक्षां खरें सांगावें तेंच बरें. (उघड) महाराज, कांहीं दिवसांपूर्वी आमचे सरकार एका अरण्यांत शिकारीस गेले होते, त्या ठिकाणीं सर्व गुणाची खाणी अशी एक सुंदर स्त्री त्यांना सांपडली.

भु०सुं०–बरें पुढें काय झालें?

कु०प्र०–नंतर तिला घरीं आणल्यावर तिच्या पातिव्रत्य-प्रभावानें आमच्या महाराजांना एक पुत्ररत्न झालें. परंतु तिनें आपल्या बुद्धीनें माझी कांहीं गुप्त गोष्ट महाराजांपुढें उघड-कीस आणली. त्यामुळें मला सर्व ठिकाणीं मान नाहींसा झाला. या करितां मी एक दिवस मादक पदार्थांचे लाडू बनवुन नेले व त्या बाईकडून सेवन करविले. (स्तब्ध होतो.)

भु०सुं०–बोला बोला, असे स्तब्ध कां? जें असेल तें खरें बोला.

कु०प्र०–पुढें त्याची निशा आल्यावर मी राजपुत्राचें पोट फाडून त्याचें काळीज तिच्या तोंडांत दिलें व आंतडीं गळ्यां-त घालून, ही लांव आहे असें महाराजांस सांगून त्यांचे पर-वानगीनें तिला मारण्याकरितां एका जंगलांत घेऊन गेलों, आणि तिला मारण्याकरितां तलवार उगारतांच माझा हात वरच्यावर

जखडून धरिल्यासारखें झालें ह्मणून त्या बाईला त्या ठिकाणीं सोडून मीं परत येण्याकरितां निघालों. त्या वेळीं तिनें विचारिलें कीं, माझ्या बापाला काय सांगाल?

भु०सुं०—मग तुह्मीं काय ह्मणालेत.

कु०प्र०—त्या लांवेला अरण्यांत नेऊन गाडून टाकिलें असें सांगेन.

भु०सुं०—पुढें काय झालें?

कु०प्र०—त्या साध्वीनें, असें सांगितल्याबरोबर पंगु होशील असा शाप दिला त्या प्रमाणें घडून आलें आहे. (असें सांगितल्याबरोबर देवाच्या पूजेचें तीर्थ भुवनसुंदरी शिंपडते तोंच खडबडून उभा राहतो व सत्वशील हकीगत ऐकून रागानें तलवार उपसून त्याला मारण्यास सरसावतो.)

भु०सुं०—(त्याचा हात धरून) छे्छे राजा, हें काय करतोस. याला मारूं नको, जीवदान दे.

स०रा०—आपण प्रत्यक्ष ईश्वर अहांत. आपली अवज्ञा कोण करील. तथापि असलें नीच कर्म करणाऱ्या नराधमाला जगांतून नाहींसाच केला पाहिजे होता.

कु०प्र०—(पायांपडून) धन्य धन्य आमच्या सारख्या अधमांचा उद्धार करण्या करितांच आपण अवतार घेतलात.

भु०सुं०—नाहीं, सोडून दे. (प्रधानास) त्या अंध झालेल्या राजास येथें आणा. (प्रतापचंद्र क्रूरसेनास आणतो) बोला, तुमचे डोळे जाण्यास काय कारण झालें ? सर्व खरें सांगा, एक शब्दही खोटें बोललां तर डोळे बरे न होतां दुसरें कांहीं व्यंग होईल.

क्रूर०—(बाजूस) ही मोठी पंचाईत आली. हरकत नाहीं अशा स्थितींत दिवस काढण्यापेक्षां खरी हकीगत सांगून दुःख मुक्त व्हावें हें बरें.

भु०सुं०—कां कसला विचार चालला आहे. सांगा लौकर.

कू०से०—महाराज, काय सांगूं माझ्या कनिष्ठ बंधूची स्त्री जी महापतिव्रता भुवनसुंदरी तिचा मी पापवासनेनें फार छळ केला. तथापि ती मला वश होईना म्हणून तुझा पति विजई होऊन आला आहे.त्याला सामोरें जाण्याकरिनां चल असें सांगुन रथांत बसविली व तो रथ हांकणाऱ्याला कांहीं इनाम देऊन त्या रथांतून तिला एका जंगलांत नेली, आणि तेथेंही अनेक प्रकारें छळून पाहिलें, परंतु तिनें माझी कामवासना पुरी केलीनाहीं.म्हणून मी तिला मारून टाकावें या हेतूनें तरवारीचा वार करण्याकरितां हात वर केला. तो वरच्यावरच माझा हात कोणी जखडुन धरिल्यामुळें तिला तेथेंच सोडून परत येण्याकरितां निघालों.

भु०सुं—मग पुढें काय झालें ?

कू०से०—मग तिनें विचारलें कीं, माझ्या विषयीं माझ्या पतीला काय सांगाल ?

भु०सुं०—मग तुम्हीं काय सांगीतलेंत ?

कू०से०—ती कोणाबरोबर पळून गेली. असें सांगेन म्हटल्याबरोबर तिनें मला—

पद.—(मिळउनियां अतां कंठ) ही चाल.

असें वदतां अंध होसी ॥ अमा दीधला शाप
मजसीं ॥ तिच्या वचनाप्रमाणेंची ॥ प्राप्त झा-
ली दशा मजला ॥ सतीला जे अधम छळि
ती ॥ तयां नाहीं सत्यसुगती ॥ धन्य साध्वी
अशी न जगतीं ॥ पूर्ण प्रचीती आली मज
ती ॥ १ ॥

(पद म्हटल्याबरोबर पूर्ववत् डोळे येतात.)

कू०से०—(पूर्ववत् दिसूं लागतांच चोहोंकडे पाहून भुव-

नसुंदरीस) अहाहा ! मला पूर्व स्वरूप देणारी प्रत्यक्ष ईश्वर-मूर्ति हीच असावी. (भुवनसुंदरीचे पायांवर डोकें ठेवितो.)

प्र०चं०—(क्रूरसेनानें सांगितलेली हकीगत ऐकतांच तलवार उपसून अति त्वेषानें) हायरे दुष्टा चांडाळा कुलांगारा तुला या जगांतून नाहींसाच करून टाकतों. (त्याला मारावयास धांवतो.)

भु०सुं०—(त्याला अडवून)

पद.—(हं दूर दूर दूर) ही चाल.

हं शूर वीर समरधीर ॥ स्वमनीं शांत होइं रे ॥
नृपा स्वमनीं ॥ धृ० ॥

प्र०चं०—नराधमासि ठार करिन ॥ तरिच मनीं शांति
धरिन ॥ सत्यवचन माझें हें ॥

मारावयास धांवतो.

भु०सुं०—(त्याला अडवून)

हं शूरवीर समरधीर ॥ नृपा शांत होइंरे ॥
बंधु वधा करुनि जगतीं ॥ होऊं नको निंद्य
अती ॥ मदिय बोल मानिरे ॥

प्र०चं०—(तलवार टाकून) महाराज, आपलें वचन कोण अमान्य करणार आहे. असल्या नराधमाचें मुख अवलोकन करण्या पेक्षां

पद.—(अग लाडके बायको०) ही चाल.

मच्छिरकमलातें अर्पण करितों ॥ या तत्पदीं ॥
॥ धृ० ॥ त्या शांतीतें ॥ प्रेमानंदें ॥ मजवरी
दे दे ॥ अमलों या संसारछंदें ॥ पावन करीं
तूं ॥ आजि आनंदें ॥

भु०सुं०—कां करिसी हें ॥ साहस ऐसें ॥ निंद्य-
कृती ही जगांतरीं ॥

प्र०चं०—

मच्छिरकम० ॥

नलगे आतां जीवित मजला ॥ सर्व जगाचा
वीट पातला ॥ काय करूं नच धीर मनीं ॥
मजसि ह्मणुनी ॥ मच्छिर ॥

भु०सुं०—राजा ऊठ ऊठ (त्याला उठवितें.) आपल्या सारख्या शूर पुरुषानें आत्महत्या करणें ह्मणजे पाप आहे समजलास.

प्र०चं०—महाराज, काय सांगूं मला भुवनसुंदरीवांचून जग शून्य भासत आहे.

भु०सुं०—ठीक आहे, मी तुझ्या भुवनसुंदरीला आतांच भेटवितों.

(असें ह्मणुन आंत जाऊन वेष बदलुन येते.)

कृ०से०—(बाजूस) मी याचा मोठा अपराध केला आहे. तरी याच्याजवळ क्षमा मागणें योग्य आहे; परंतु त्या साध्वीला हें माझें काळें तोंड कसें दाखवूं. असो आतां तिला साष्टांग नमस्कार घालावा ह्मणजे झालें. (असें ह्मणून नमस्कार घालतो.)

भु०सुं०—(प्रतापचंद्रास आलिंगन देऊन) प्राणनाथ इतकावेळ मी आपणास घोटाळ्यांत घातलें त्याची क्षमा असावी. (सर्व मंडळी भुवनसुंदरीस वंदन करितात व प्रधानादिक क्षमा मागतात.)

प्र०चं०—प्रिये—

(पद.—)

आनंदित मी झालों स्वमनीं ॥ सेवुनी राज्य
सुखाला ॥ आ० ॥ जिकडे तिकडे पूर्ण शांत

ता ॥ होवो या महिला ॥ आ० ॥ झुरतसें तुजविण दिनरजनी ॥ शेवटीं भेटलिस सखे मजला ॥ इच्छा आतां नुरली काहीं ॥ हृदयीं प्रेम भरला ॥ आ० ११ ॥

आतां ईश्वरापाशीं इतकेंच मागणें आहे.

॥ पुस्तककर्त्याची ईश्वरास प्रार्थना ॥

पद-(ब्यांडची) चाल.

तारक तो सर्वां शंकर ॥ शशिशेखर ॥ सौख्य जगाला तो देवो ॥ नीलकंधर ॥ प्रपंचा या बहु विटलों ॥ आणि शिणलों ॥ मायेनें ॥ तव भजनीं विस्मरलों ॥ मी उमावरा पुजियला ॥ मी चरणीं लीन झालों असें ॥ मद्बुद्धीनें बधीयेलें ॥ ये धांवोनी गौरीशा मुक्त कराया ॥ धृ० ॥ मित्रसमूह याठाईं ॥ परमेशा जमला असे ॥ हे कामारी सुकीर्ती ॥ पसरोनी दैन्य हरीं ॥ कालकूट तूं प्रासियलें ॥ गौरीशा जगदीशा ॥ त्वत्पदीं दे मजला ठाव ॥ या तव दासा ॥ बलवंता गौरीशा ॥ तार ॥ ॥ १ ॥ धृ० ॥

समाप्त.